संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी,
वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २६१ * * अकोला * मंगळवार, दिनांक १८ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

।। परमात्मा एक ।।
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## भाजपचे योग्य पाऊल

काल विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने कट्टर भाजपच्या कार्यकर्त्यांना तिकीट देऊन एक योग्य पाऊल उचललेले आहे. आयात केलेले कितीतरी खासदार आणि आमदार भारतीय जनता पक्षात महत्वाची पदे उपभोगत आहेत. सत्ता असली की, त्या पक्षाकडे हवेत उडणारे भले भले पक्षी आपली पक्षीय निष्ठा बदलून उडत उडत सत्तारूढ पक्षात पदावर आरुढ होण्यासाठी तत्पर असतात. भारतीय जनता पक्षाजवळ स्वतःचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर आहेत. या निष्ठावंतांना आपल्या निष्ठेचे फळ मिळालेच पाहिजे. असे भारतीय जनता पक्षाचे अनेक कार्यकर्ते खाजगीत बोलत असतात. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जाहीर सभांना मोठ्या प्रमाणात जनता गर्दी करीत असे. पण निवडणुकीमध्ये मते देताना मात्र त्याची प्रचिती येत नव्हती. तरीही वर्षानुवर्षे पदरचा पैसा खर्च करून अगदी कच्चा चिवडा खाऊन पक्षासाठी निष्ठेने कार्य करणारे आणि निवडणूक लढवणारे कितीतरी नेते आम्हाला ठाऊक आहेत. नागपूरच्या लोकमाता सुमतीताई सुकळीकर यांनी काँग्रेसचा बोलबाला असतानाही पक्षाचा आदेश मानून काही निवडणुका लढवल्या. त्यामध्ये दुर्दैवाने त्यांना एकदाही यश मिळाले नाही. त्यांच्यासारख्या समर्पित विचारांच्या, विधायक वृत्तीच्या आणि सर्व जनतेत आदराचे स्थान असलेल्या सुमती ताईंना त्यावेळच्या मतदारांनी विधानसभेत पाठवलेच नव्हते. त्या विजयी झाल्या नाहीत, तरीही त्यांच्याबद्दलचा आदर सर्व स्तरावर नेहमीच दिसून आला आणि आजही दिसून येतो. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. आता गेल्या दहा वर्षात भारतीय जनता पक्षाची जी भरभराट होत आहे. त्यात अनेकदा जुन्या कार्यकर्त्यांना संधी मिळू शकत नाही. जातीपातीच्या राजकारणाबरोबर इतर अनेक बाबी आता विचारात घ्याव्या लागतात. सत्तारूढ होण्यासाठी बाहेरच्या अनेक उमेदवारांना तिकीटे द्यावी लागतात. आपल्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आणणे महत्त्वाचे असते. मग जे पदरी पडतात त्यांना पवित्र करून घेणे महत्त्वाचे असते. अशा वातावरणात भारतीय जनता पक्षाने यावेळी विधान परिषदेसाठी जे तीन उमेदवार दिलेले आहेत. ते तिघेही अस्सल शंभर नंबरी म्हणजेच भारतीय जनता पक्षासाठी खऱ्याखुऱ्या सोन्याचे आहेत. या तीन पैकी दोन उमेदवार विदभार्चे आणि एक मराठवाड्याचा आहे. या यादीत नागपूरचे माजी महापौर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत जवळचे असलेल्या संदीप जोशी यांना तिकीट देण्यात आलेले आहे. 2019 मध्ये संदीप जोशी यांना भारतीय जनता पक्षाने विधान परिषदेची उमेदवारी दिली होती. त्या पदवीधर मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांचे पिताश्री गंगाधरराव फडणवीस आणि त्यानंतर सध्याचे केंद्रीय मंत्री आणि मार्गसम्राट नितीनजी गडकरी अनेक वेळा निवडून आलेले होते. दुर्दैवाने त्यावेळी संदीप जोशी यांचे गणित जमले नाही. त्यांच्यासारख्या हरहुन्नरी कार्यकर्त्याला यावेळी तिकीट देणे गरजेचे होते. मुख्यमंत्री फडणवीस आणि भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांना संधी देऊन त्यांच्यावर दाखवलेला विश्वास ते सार्थ ठरवतील, यात शंकाच नाही. दुसरे उमेदवार म्हणजे दादाराव केचे. दादाराव केचे हे वर्धा जिल्ह्यातील आवीर्चे आमदार होते. त्यांच्या ऐवजी देवेंद्रजींच्या तत्कालीन सचिव सुमित वानखेडे यांना त्यावेळी तिकीट देण्यात आले होते. दादाराव यांनी वर्धा जिल्ह्यात भारतीय जनता पक्षासाठी बरेच मोठे कार्य करून पक्षात आपली छाप पाडलेली होती. तिकीट कापलेल्या केचे यांना विधान परिषदेमध्ये संधी दिली जाईल. असे आश्वासन दिल्यानंतर केचे साहेबांनी पक्षासाठी शिस्तीत आपले काम केले असे सर्वजण म्हणतात. त्यांना तिकीट देऊन भाजपने त्यांच्यावर त्यावेळी झालेला अन्याय दूर केलेला आहे. तिसरे उमेदवार संजय केनेकर यांना घोषित करण्यात आलेले आहे. हे ओबीसी नेते आहेत आणि संघटनेसाठी सर्वतोपरी कार्य करणारा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. अशा प्रकारे भारतीय जनता पक्षाचे आपले तीनही उमेदवार शुद्ध भाजपचे कार्यकर्ते असलेले निवडलेले आहेत. ही या उमेदवारांकरिता गवार्ची बाब आहे. त्याचबरोबर पक्षश्रेष्ठींनी मूळच्या निष्ठावंताना मान देण्याची ही पावती आहे, असेही म्हणावे लागेल. भारतीय जनता पक्षाजवळ आमदारांची मोठी फौज आहे. त्यामुळे हे तीनही उमेदवार नक्कीच निवडून येतील. किंबहुना ते निवडून आलेलेच आहेत. याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. या तिन्ही भावी आमदारांचे मनःपूर्वक अभिनंदन करूया आणि त्यांच्या कार्यकाळात वाढ होवो. ही सदिच्छा व्यक्त करूया!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे लोकार्पण

### देशातील पहिले मंदिर, फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १७ :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या देशातील पहिल्या मंदिराचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी बोलताना फडणवीसांनी शिवरायांचे हे मंदिर भावी पिढ्यांना अखंड प्रेरणा देत राहील अशी भावना व्यक्त केली.

दरम्यान, या मंदिरात शिवाजी महाराजांची कृष्णशिळेची ६ फूट उंच मूर्ती साकारण्यात आली आहे. अयोध्येतील राम मंदिरातील रामलल्लांची मूर्ती तयार करणाऱ्या अरुण योगीराज यांनी ही मूर्ती तयार केली आहे.

शिवक्रांती प्रतिष्ठानच्या माध्यमामातून भिवंडीवाडा रस्त्यावरील मराडे पाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे हे मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिर परिसरात शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित इतिहास समाजाला कळावा यासाठी ३६ शिल्पचित्रे साकारण्यात आली आहेत. त्यात प्रत्येक प्रसंगाची माहिती मराठी, हिंदी व इंग्रजी या ३ भाषेत देण्यात आली आहे. हे मंदिर शिवप्रेमींना एक तीर्थस्थळ म्हणून समर्पित होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मंदिराचे उद्घाटन केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्व प्रसंग इथे आहेत. आई तुळजाभवानी देखील आहे. माता जिजाऊही आहेत. हे राष्ट्रमंदीर आहे. त्यामुळे यातून सर्वांना प्रेरणा मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर झाले आहेत. पाच पैकी तीन जागांसाठी भाजपने काल उमेदवार जाहीर केले होते. आज राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने उमेदवार जाहीर केले आहेत. शिवसेनेने चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसने संजय खोडके यांच्या नावाची घोषणा केली.

भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. विधानपरिषदेच्या रिक्त जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. १८ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. तर, मतदानाची तारीख २७ मार्च आहे. पाचपेक्षा अधिक अर्ज आले नाहीत तर निवडणूक बिनविरोध होऊ शकते.

विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली तरी विरोधी पक्षांनी मात्र उमेदवार दिलेला नाही. कारण विधानसभेत महाविकास आघाडीच्या घटकपक्षांच्या आमदारांची संख्या कमी आहे. त्यामुळे उमेदवार दिला तरी यश मिळणार नसल्याची खात्री असल्याने महाविकास आघाडीने या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही.

दरम्यान, शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गटाकजून अनेक जण या जागेसाठी इच्छुक होते. मात्र, शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि अजित पवार गटाकडून संजय खोडके यांना संधी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातील कामकाजाला आज सुरूवात झाली.

## एका दहशतवाद्याचा खात्मा

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १७ :** जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरील खुरमोरा राजवार भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला आणि काही दहशतवादी वेढा तोडून पळून जाण्यात यशस्वी झाले. पळून गेलेल्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरूच आहे. एक सैनिक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

जचलदाराच्या क्रुम्हुरा गावात अतिरेकी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी तेथे घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केली. दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केल्यानंतर शोध मोहिमेचे रूपांतर चकमकीत झाले. सकाळपासून सुरू असलेल्या चकमकीत एक दहशतवादी ठार झाला असून त्याच्याकडून एक असॉल्ट रायफलही जप्त करण्यात आली आहे.

## काँग्रेस,तृणमूलचा राज्यसभेतून वॉकआउट

■ **वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. १७ :** काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने डुप्लिकेट मतदार ओळखपत्रावर चर्चा करण्याची मागणी करीत राज्यसभेतून सभात्याग केला.

तृणमूल काँग्रेस (टीएमसी), काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या १० खासदारांनी नियम २६७ अंतर्गत नोटीस दिली. याअंतर्गत, त्यांनी सभागृहाचे दिवसाचे कामकाज थांबवावे आणि (डुप्लिकेट मतदार ओळखपत्र) या मुद्द्यावर चर्चा करावी अशी मागणी केली.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी याला नकार दिला. परिणामी, या दोन्ही पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेतून वॉकआऊट केले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी लोकसभेत रेल्वेमंत्र्यांवर निशाणा साधला. जेव्हा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व्हेंटिलेटरवर असतो तेव्हा इंस्टाग्राम रील्स बनवून काही फायदा होत नाही, असे त्या म्हणाल्या.

वर्षा गायकवाड अनुदान मागण्यांवरील चर्चेत भाग घेत होत्या.

## नागपूरकरांनी शांतता बाळगावी

### गडकरी यांचे आवाहन

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :** नागपुरातील महाल भागात तरुणांच्या दोन गटांमध्ये झालेल्या वादानंतर तणावपूर्ण स्थिती निर्माण होणे दुर्दैवी असून, नागपूरकरांनी शांतता बाळगून प्रशासनाला परिस्थिती हाताळण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन नागपूरचे खासदार आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे.

नागपूर हे शांतता व सौहार्दासाठी देशभरात प्रसिद्ध असलेले शहर आहे. या शहरात जात-पंथ-धर्म या विषयावरून वाद किंवा भांडणे होत नाहीत. आज जे काही घडले, त्यासंबंधी प्रशासन कार्यवाही करेलच. नागपूरच्या सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि शांतता प्रस्थापित होईल यासाठी स्वतः देखील प्रयत्न करावेत, असे नितीन गडकरी यांनी म्हटले आहे.

## नागपुरात सलग तिसऱ्या दिवशी हत्याकांड

## चाकूने भोसकून निर्घृण खून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** गृहमंत्र्याचे शहर अशी ओळख असलेल्या नागपुरात सलग तिसऱ्या दिवशी हत्याकांड घडले. सोमवारी पहाटे एका युवकाने व्यक्तीचा भोसकून खून केला. जवळपास ८ तास मृत्यूशी झुंज दिल्यानंतर सोमवारी सकाळी तरुणाचा मृत्यू झाला. ही थरारक घटना धंतोली पोलिस ठाण्यांतर्गत रविवारी रात्री घडली. मृताच्या मित्रांनी आरोपी विद्यार्थ्याच्या घरावर हल्ला करून तोडफोड केली.

माहिती मिळताच धंतोली पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि संतप्त तरुणांना शांत केले. अंकुश वामन देवगिरकर (३५) रा. राहुलनगर झोपडपट्टी असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी आरोपी आयूष पिंटू मंडपे (१९) याला अटक केली आहे.

अंकुश एका भंगारवाल्याकडे काम करीत होता आणि आईसोबत परिसरात रहात होता. आरोपी आयूष हा धरमपेठ सायंस कॉलेजमध्ये बीएस्सी प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. तो वस्तीत नेहमीच दादागिरी व दारू पिवून शिविगाळ करतो. त्याच्या अशा कृत्यामुळे वस्तीतील लोक त्रस्त होते. मात्र, भीतीमुळे त्याला बोलण्याची कोणी हिंमत करीत नव्हता.

रविवारी रात्री आयूषने मित्रांसोबत दारू पार्टी केली. रात्री १०.३० वाजताच्या सुमारास तो राहुलनगर झोपडपट्टी चौकात आला. मद्यधुंद अवस्थेत तो कोणाचे काहीही ऐकत नव्हता. त्यामुळे मित्र त्याला तेथेच सोडून निघून गेले. काही वेळाने दारूच्या नशेत असलेल्या आयूषने शिविगाळ सुरू केली. त्याच दरम्यान अंकुश शतपावली करण्यासाठी घरून निघाला होता. चौकात त्याला आयूष शिविगाळ करताना दिसला. अंकुशने त्याला समजवण्याचा प्रयत्न केला. महिला, युवती रस्त्याने फिरत असल्यामुळे शिविगाळ करण्यास मनाई केली. मात्र आयूषने त्यालाच शिविगाळ सुरू केली. त्यामुळे अंकुशने त्याची कॉलर पकडून एक कानशिलात लगावली.

भरचौकात लोकांसमोर कानशिलात बसल्याने आयूषचा अहंकार दुखावला. तो धावत-पळत घरी गेला. स्वयंपाक खोलीतील भाजी कापण्याचा चाकू घेऊन आला. काही समजण्यापूर्वीच त्याने अंकुशवर हल्ला चढवला. पोट आणि पाठीवार सपासप चार वार केले. अंकुश रक्ताच्या थारोळ्यात जागीच कोसळला.

वस्तीतील लोक गोळा झाल्यामुळे आयूष घटनास्थळावरून पसार झाला. अंकुशला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. माहिती मिळताच धंतोली पोलिस घटनास्थळी पोहोचले. खुनाचा गुन्हा नोंदवून आरोपी आयूषचा शोध सुरू केला. तो छत्रपती चौकातील एका पानटपरीखाली दडून बसला होता. तेथून पोलिसांनी त्याला अटक केली.

सोमवारी सकाळी अंकुशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अंकुशच्या मृत्यूने संतापलेल्या त्याच्या मित्रांनी आयूषच्या घरावर हल्ला केला. सामानाची तोडफोड करून नुकसान केले. याबाबत माहिती मिळताच धंतोली पोलिस घटनास्थळी पोहोचले. लोकांची समजूत घालून त्यांना शांत करण्यात आले. दरम्यान आरोपी आयूषला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २० मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. अंकुश हा वृद्ध आईचा एकमेव आधार होता. त्याच्या मृत्यूने आई आणि बहिणीला मोठा धक्का बसला आहे.

## लाडकी बहीण योजनेत दुरुस्ती होणार : अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. पण तिच्यात दुरुस्ती होईल. सरकार कोणत्याही बहिणीचे पैसे परत घेणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत स्पष्ट केले

अजित पवार म्हणाले, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या हातात एक मोठी रक्कम जाणार आहे. हा थोडा-थोडका पैसा नाही. सुमारे ४५ हजार कोटी वषार्ला महिलांच्या हातात जाणार आहेत. त्यातून ती बहीण सक्षम होईल. तिच्या कुटुंबाला हातभार लागेल. हा पैसा राज्याच्या अर्थव्यवस्थेत येऊन अर्थव्यवस्थेलाही छोटे-मोठे योगदान मिळेल.

अर्थमंत्री म्हणून मी जेव्हा या योजनेकडे पाहतो, त्यावेळी या योजनेतून राज्याच्या अर्थव्यवस्थेला भविष्यात काय मिळणार आहे? १५००रुपयांची थेट रोख रक्कम भगिनींना मिळते आहे.

## एकाच सातबारावर ३०० क्विंटलची धान खरेदी?

■ **महासागर प्रतिनिधी, वडसा, दि. १७ :** मागील काही वर्षांपासून चंद्रपुर आणि गडचिरोली जिल्ह्याचा अतिरिक्त प्रभार असलेले पणन अधिकारी विश्वनाथ तिवाडे यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात धान खरेदी घोटाळा झाला आहे. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी व्यवस्थापकीय संचालक, पणन विभाग मुंबई यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

आरमोरी खरेदी विक्री संस्थे अंतर्गत कासवी येथील शासकीय धान खरेदी केंद्रावर एकाच सातबारावर अनेकांचे नावे असल्याने प्रत्येकाच्या नावाने प्रत्येकी ५० क्विंटलची खरेदी दाखवून प्रती सातबारावर ३०० क्विंटलची धान खरेदी दाखवण्यात आली आणि संबंधितांच्या बँक खात्यात रक्कम वळती करून तिवाडे यांनी कोट्यवधी रुपयाने फसवणूक केली.

मागील १० ते १२ वर्षांपासून मार्केटिंग फेडरेशन गडचिरोलीचा अतिरिक्त प्रभार असलेले विश्वनाथ तिवाडे यांचेकडे चंद्रपुर जिल्ह्याचाही अतिरिक्त प्रभार आहे. त्यांच्या कार्यकाळात २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये कासवी येथील शासकीय धान खरेदी केंद्रावर संस्थेचे संचालक व त्यांच्या नातेवाईकांशी संगनमत करून तिवाडे यांनी एका सातबारावर किमान १२ क्विंटल धान खरेदी करावयाचे असतांना सातबारावर नावे असलेल्या प्रत्येकाच्या नावाने ५० क्विंटल याप्रमाणे एका सातबारावर तब्बल ३०० क्विंटल धान खरेदी दाखवली.

प्रत्यक्षात दाखविण्यात आलेल्या धान खरेदीच्या प्रमाणात धान खरेदी करण्यातच आली नाही. तरीही धानाची रक्कम अदा करण्यात आली. यात भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावाने तसेच रब्बी हंगामात धानाची लागवडच केली गेली नसतांना धान खरेदी दाखवून रक्कम संबंधित बोगस शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वळती करण्यात आली. यातून तिवाडे यांनी शासनाची कोट्यवधी रुपयाने फसवणूक केली.

दरम्यान, गडचिरोली जिल्ह्याच्या चामोर्शी तालुक्यातही भूमिहीन शेतकऱ्यांच्या नावाने बोगस धान खरेदी दाखवून धानाची व बोनसची रक्कम मिळुन शासनाचे कोट्यवधी रुपये खरेदी विक्री संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या बँक खात्यात वळती करून रकमेची उचल केल्याचे समोर येऊ लागले आहे. या संदर्भात भाजपा सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष आशिष पिपरे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री फडणवीस यांचेकडे दस्तावेज सादर करून चौकशीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने चौकशीचे आदेश देण्यात आले होते. मात्र कारवाई अद्यापही थंडबस्त्यात आहे.

तिवाडे यांच्या कार्यकाळात गडचिरोली जिल्ह्यासह चंद्रपुर जिल्ह्यातही पणन विभागाच्या धान खरेदी केंद्रावर असाच प्रकार घडल्याचे धक्कादायक वास्तव असुन या माध्यमातून तिवाडे यांनी कोट्यवधीची अपसंपदा जमवली आहे. आरमोरी तालुक्यात तिवाडे यांनी कोट्यवधी रुपयाची मालमत्ता खरेदी केली आहे. कासवीच्या संचालकाचे नातेवाईकच धान खरेदी केंद्रावर ऑनलाईन खरेदीचा व्यवहार करीत असल्याने तसेच ज्या बँकेत संचालकांचे नातेवाईक नोकरीला आहेत त्याच बँकेच्या खात्यात रक्कम वळती करण्यात आल्याने हे प्रकरण संघटित गुन्हेगारीत मोडते. या संपुर्ण गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून तसेच तिवाडेंच्या संपत्तीची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी दिलेल्या तक्रारीतुन केली आहे.

# लाडकी बहिण योजनेचा समाजकल्याण विभागाला फटका

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :** राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू करीम महिलांना महिन्याकाठी दीड हजार रुपये दिले जात आहेत. तथापि, या योजनेमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडत असून, अनेक विभागांच्या निधीत मोठी कपात करण्यात येत असल्याचे दिसते.

इतर अनेक योजनांचे आणि खात्याचे पैसे लाडकी बहीण योजनेकडे वळवण्यात आल्याचा आरोप होत असताना आता मंत्र्यांनी देखील जाहीर नाराजी व्यक्त करत इशारा दिला आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शिरसाट म्हणाले, लाडकी बहिण योजना चांगली आहे. त्यासाठी पैसे दिले पाहजे. परंतु सामाजिक न्याय व आदिवासी खात्याला घटनेच्या तरतुदीनुसार पैसे द्यावे लागतात. त्यात कपात करता येत नाही. लाडकी बहीण योजनेसाठी ४ हजार कोटी, पंतप्रधान आवास योजनेसाठी १५०० कोटी, ऊर्जा विभागासाठी १४०० कोटी असे एकूण सात हजार कोटींचा फटका



सामाजिक न्याय विभागाला बसला आहे.

हा विभाग मागास लोकांना प्रवाहात आणण्यासाठी आहे. मुख्यमंत्र्यांनी, अर्थमंत्र्यांनी जर या खात्याच्या निधीमध्ये कपात केली तर कामे कशी होतील? यासाठी तरतूद करून द्या असं माझं मत आहे. पैसे इतर ठिकाणी वळवले याचे दुरगामी परिणाम होतील, उद्रेक होईल. यासाठी सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे पैसे कपात करू नये, मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांना पत्र लिहून मागणी करणार आहे, माझ्या खात्यातून पैसे घेताना संमती घेतली पाहजे होती. संमती मागितली असती तर मला देता आली नसती. हे बंधन आम्हाला कायद्याने दिले आहे, असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, समाजकल्याण आणि आदिवासी विभागाचा कोट्यवधीचा निधी लाडकी बहिण योजनेसाठी वापरला जात असल्याने या विभागाच्या अनेक योजनांचा लाभ पात्र लाभधारकांना मिळणार नाही.

## रूग्णालयांची प्रतिपूर्ती रखडली, जनआरोग्य योजना प्रभावित

लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकार आर्थिक अडचणीत सापडले आहे. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेचे राज्यभरातील रुग्णालयांचे गेल्या नऊ महिन्यांपासून सुमारे ९२३ कोटी रुपयांची प्रतिपूर्ती सरकारने थकवली आहे.

शासनाकडून पैसेच मिळत नसल्याने रुग्णालयांकडून रुग्णांना उपचारासाठी दाखल करून घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. दरम्यान, रुग्णालयांना प्रतिपूर्ती न मिळाल्यास या योजनेची सेवा थांबविण्याचा निर्णय घेणार असल्याचा इशारा आयएमएने दिला आहे.

या योजनेमध्ये नोंदणीकृत रुग्णालयांद्वारे मोफत उपचार केले जातात. उपचारानंतर रुग्णालय व्यवस्थापन सरकारकडे बिलाच्या रकमेचा दावा करून त्याचा परतावा घेते. मात्र, ही रक्कम पदरात पाडून घेताना खासगी रुग्णालयांना अनेक कसरती कराव्या लागत आहेत. जूनमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लाडकी बहीण योजना जाहीर केल्यानंतर यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी वर्ग करण्यात आला आहे.

या योजनेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात ३०५९ कोटी ५२ लाख रुपयांची तरतूद केली होती. मात्र, आतापर्यंत केवळ ८१५.७४ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्याने रुग्णालयांची अडचण झाली आहे.

या योजनेचे काम विमा कंपनीकडून काढून शासनाने स्वतःकडे घेतल्यापासून बिलांच्या परताव्यासाठी खासगी रुग्णालयांना कसरत करावी लागत आहे. रुग्णालयांनी स्वतःचे पैसे टाकून लाभार्थींवर उपचार केले. अनेक रुग्णालय कर्जबाजारी झाले. सरकारने तातडीने बिलाचे पैसे द्यावे अन्यथा सेवा थांबविण्याशिवाय पर्याय नाही, असे आयएमएचे राज्य सचिव डॉ. संजय पाटील यांनी म्हटले आहे.

सरकारच्या उदासीनतेमुळे रुग्ण, रुग्णालय आणि शासनात वाद निर्माण होऊन त्याचा फटका रुग्णांना बसत आहे. अनेक रूग्णालये आता रूग्णांला लाभ देण्यास तयार नाहीत.

# बरं झालं पक्ष फुटला...



■ **मुंबई :** शरद पवार गटाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी पहिल्यांदाच राष्ट्रवादीच्या फुटीवर थेट आणि मोठं विधान केलं आहे. बरं झालं पक्ष फुटला, असं विधान सुप्रिया सुळे यांनी केलं आहे. तसेच त्यांनी राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांचं नाव न घेता त्यांच्यावरही जोरदार हल्लाबोल केला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या आढावा बैठकीत सुप्रिया सुळे यांनी हे विधान केलं आहे. त्यामुळे सुप्रिया सुळे यांच्या विधानाची जोरदार चर्चा रंगली आहे.

शरद पवार यांच्या नेतृत्वाताली राष्ट्रवादीची आढावा बैठक होती. या बैठकीची एक ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. त्यात सुप्रिया सुळे यांनी हे विधान केलं आहे. मला कधी कधी वाटतं बरं झालं पक्ष फुटला. ते या पक्षात असते आणि मी या पक्षात असते तर एक तर ते तरी राहिले असते किंवा मी तरी राहिले असते. मी त्या पक्षात काम करू शकत नाही. . सगळ्या दुनियेला माहीत आहे. माझी लढाई त्यांच्याबरोबर ते पक्षात असतानाही होती. मी हे कधी बाहेर बोलले नाही, पण संघटनेत आहे म्हणून बोलते, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांचं नाव न घेता जोरदार निशाणा साधला.

जो पुरुष स्वतःची जी बायको, जी आपल्या मुलांची आई आहे, तिच्या गाडीत बंदूक ठेवू शकतो अशा पुरुषाबरोबर.. एक तर तो पुरुष नाहीच आणि त्याच्याबरोबर मी काम करू शकणार नाही. तेव्हापासून लढाई सुरू झाली. मी आज पहिल्यांदाच ही गोष्ट बोलले. मी माईकवरही बोलेल. मी नाही कुणाला घाबरणार. मी असली फालतू लढाई करत नाही. मी विरोधी पक्षात आयुष्य घालवेल, पण नैतिकता सोडणार नाही. मला नकोय ते कंत्राटदाराचे पैसे. माझं घर काही त्या कॉन्ट्रॅक्टरच्या पैशावर चालत नाही, असा हल्लाच त्यांनी चढवला.

संतोष भाऊच्या आईला भेटा, बायकोला भेटा. महादेव मुंडेंच्या बायकोला भेटा. काय चूक केली त्यांनी? त्यांच्याकडे मुलांना लेकरं म्हणतात. आपण मुलं म्हणतो. महादेव मुंडेंची बायको विचारते, माझ्या लेकरांची चूक काय उत्तर द्या? काय उत्तर देणार? आणि मग जेव्हा संतोष भाऊच्या घरी गेले. त्यांच्या आईने माझा हात धरला. म्हणाल्या, तू मला न्याय देणार का? शब्द दे सुप्रिया तू मला न्याय देशील, असंही त्या म्हणाल्या.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर राज्य चालतेय का? राऊत यांचा सवाल



■ **मुंबई :** महाराष्ट्रातील राज्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर चालतेय का? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एखादा देखावा किंवा चित्र निर्माण केले गेले असेल, तर पोलिसांना हस्तक्षेप करायची गरज काय? असा प्रश्न देखील राऊत यांनी उपस्थित केला. कल्याण मधील देखाव्यावर केलेल्या कारवाईनंतर संजय राऊत यांनी हा संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

पोलिसांनी नरेंद्र मोदी यांचे पॉडकास्ट ऐकावे. त्यामध्ये नरेंद्र मोदी यांनी टीका सहन करायला हवी, असे म्हटले आहे. त्यामुळे पोलिसांवरही काही टीका झाली असेल तरी त्यांनी ती सहन करायला हवी. मात्र, याचा अर्थ पोलिस सरकारचा आदेश पाळत नाहीत. पोलिसांनी बंडखोरी केली आहे, असा आरोप देखील संजय राऊत यांनी केला आहे. रावल यांच्या सारखे एकच नाही तर किमान सात ते आठ मंत्री या सरकारमध्ये आहेत, जे महाराष्ट्राचे वातावरण खराब करत असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे अशा मंत्र्यांचे बळी जाणारच आहेत. हे बळी घेण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे काही लोक आम्हाला हत्यारे पुरवत असल्याचा दावा देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

**फडणवीस यांनी आत्मचिंतन करायला हवे**

भारतीय जनता पक्षाची राज्य करण्याची पद्धत नक्कीच कपट आणि कारस्थानी असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. कपट आणि कारस्थान हे अत्यंत घृणास्पद पद्धतीने राजकारणात कोणी आणले असेल तर ते भारतीय जनता पक्षाच्या लोकांनीच आणले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री फडणवीसांवर केलेल्या टीकेवर राऊत बोलत होते. आपल्या विरोधकांना तुरुंगात टाकणे, त्यांच्या कुटुंबीयांचा छळ करणे, त्यांच्या परिवाराचा छळ करणे, अशा अनेक गोष्टी भाजपने केल्या आहेत. यात हल्ले करण्याचाही समावेश असल्याचे ते म्हणाले. या देशातील राजकारणातला सुसंस्कृतपणा भारतीय जनता पक्षातील नेत्यांनीच घालवला असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांनी निर्माण केलेला पॅटर्न मागच्या पाच वर्षात आम्ही अनुभवला आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दल आग आणि संताप नक्कीच आहे. महाराष्ट्र काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी फडणवीस यांना औरंगजेब म्हटले आहे. मात्र अशी बोलण्याची वेळ का आली? याचे आत्मचिंतन फडणवीस यांनी करायला हवे, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

# औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण चालणार नाही

## फडणवीस यांची भूमिका; शिवरायांच्या मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा देण्याची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

महाराष्ट्रात मोगल बादशहा औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण चालणार नसल्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी स्पष्ट केली. एएयआयने 50 वर्षांपूर्वी औरंगजेबाच्या कबरीला संरक्षण दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारलाही तिला संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. पण महाराष्ट्रात औरंगबेजाबाच्या कबरीचे केव्हाही उदात्तीकरण होणार नाही. येथे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचे उदात्तीकरण होईल, असे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने (तिथीनुसार) भिवंडीवाडा रस्त्यावरील मराडे पाडा येथील शिवरायांच्या पहिल्या मंदिराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी बोलताना फडणवीसांनी या मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा देण्याची घोषणा केली.

**फडणवीसांकडून ४ महत्त्वाच्या घोषणा**

फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना यूनेस्कोकडून जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळवण्याचा आमचा प्रयत्न आहे. संगमेश्वर येथे ज्या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांना अटक करण्यात आली, तो संगमेश्वरचा वाडाही सरकार विकासासाठी घेणार आहे. सरकार तिथे स्मारक बांधेल.



याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांना आग्र्यात ज्या ठिकाणी औरंगजेबाने कैद केले होते, ती जागाही स्मारक विकसित करण्यासाठी देण्यात यावी यासाठी सरकारने उत्तर प्रदेश सरकारला विनंती केली आहे. यासंबंधी अर्थसंकल्पातही योग्य ती तरतूद केली आहे.

पानीपतच्या युद्धात मराठ्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले होते. त्यानंतर १० वर्षांनी महादजी शिंदे यांनी दिल्लीच्या तख्तावर आपला झेंडा रोवला होता. त्यामुळे सरकार पानीपत येथेही स्मारक बांधणार आहे. तूर्त सरकार शिवाजी महाराजांच्या या मंदिराला तत्काळ तीर्थस्थळाचा दर्जा देईल.

फडणवीस यांनी यावेळी शिवरायांचे मंदिर व औरंगजेबाच्या कबरीवरील आपली भूमिकाही स्पष्ट केली. ते म्हणाले, महाराष्ट्रात केवळ शिवरायांचेच महिमामंडन होईल. औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण होणार नाही. औरंगजेबाच्या कबरीला एएयआयने ५० वर्षांपूर्वी संरक्षण दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला तिथे संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. पण या महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीचे केव्हाच महिमामंडन होणार नाही.

शिवाजी महाराजांचे मंदिर यासाठी की आज आपण आपल्या इष्टदेवतेच्या मंदिरात जाऊन साधना करू शकतो याचे एकमेव कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होते. त्यांनी देव, देश, धर्माची लढाई जिंकली म्हणून तुम्ही-आम्ही हिंदू आहोत. जसे हनुमानाचे दर्शन घेतल्याशिवाय प्रभू श्रीरामांचे दर्शन पूर्ण होत नाही. तसे छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतल्याशिवाय कुठल्याच देवाचे दर्शन आपल्याला फळणार नाही.

**शिवरायांचे मंदिर खऱ्या अर्थाने राष्ट्रमंदिर**


हे फक्त मंदिर नाही. या मंदिराला सुंदर तटबंदी आहे. बुरूजं आहेत. दर्शनीय असा प्रवेशमार्ग आहे. सुंदर बगिचा आहे. शिवरायांच्या जीवनातले सर्व प्रसंग आपल्याला इथे पाहावयास मिळतात. अतिशय सुंदर अशा शिल्पांमध्ये शिवरायांच्या जन्मापासून राज्याभिषेकापर्यंत तथा छत्रपती संभाजी महाराजांनी वाघाचा जबडा फाडला त्या प्रसंगापर्यंतचे सर्व प्रसंग आपल्याला या मंदिरात पाहायला मिळतात, असे ते म्हणाले. छत्रपती शिवरायांसोबत महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीही इथे आहे. हे खऱ्या अर्थाने राष्ट्रमंदिर आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही, असेही देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

# काँग्रेसच्या नव्या प्रदेशाध्यक्षांचा २४ तासांत युटर्न

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला होता. त्यांनी फडणवीस सरकारची तुलना औरंगजेबाच्या राज्यकारभाराशी केली होती. मात्र त्यानंतर आता अवघ्या २४ तासांमध्येच त्यांनी युटर्न घेतला आहे.

भ्रष्टाचार आणि हिंसाचार या दोन्हीचा या सरकारच्या माध्यमातून जो उद्रेक उभ्या महाराष्ट्राला बघायला मिळतोय तो अत्यंत क्रूर आणि वाईट स्वरुपाचा आहे. सध्याचा जो देवेंद्र फडणवीस सरकारचा कारभार आहे तो हा कारभार आणि औरंगजबाचा कारभार एक सारखाच असल्याचं वक्तव्य मी काल केलं होतं. यात कुठल्याही प्रकारची चूक नाही.



औरंगजेब निश्चित क्रूर होता, आणि औरंगजेबाने स्वतःचा भाऊ दाराशिको याचा खून केला, त्यांचं धड दिल्लीत गाडलं. वडिलांना अटक केली. त्यामुळे औरंगजेब निश्चित क्रूर होता. औरंगजेब जेवढा क्रूर होता तेवढंच फडणवीसांचं सरकार क्रूर आहे. हे माझं वक्तव्य होतं.

मात्र या विधानाच्या संदर्भामध्ये भाजपची का पोटदुखी झाली आहे, ते मला समजलं नाही. मी काही चुकीचं बोललो नाही. मी काही फडणवीसांबद्दल अपशब्द वापरले नाहीत.

देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख मी केला नाही. मात्र भाजपमधील जी नेतेमंडळी आहेत ती सरसकट देवेंद्र फडणीस हे औरंगजेबासारखे होते असा जो कांगावा करत आहेत, याचाच अर्थ काय तर त्यांच्याच पक्षातील लोक फडणवीसांना औरंगजेब ठरू पाहात आहेत. असा घणाघात यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात गाजले शिक्षक आत्महत्या प्रकरण

## संस्थाचालकावर गुन्हा दाखल होणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्याच दिवशी बीड येथील शिक्षकाच्या आत्महत्येचा मुद्दा सभागृहात गाजला.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीडमधील शिक्षकाच्या आत्महत्याप्रकरणावरुन सरकारला सवाल उपस्थित केले. तसेच संबंधित संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही, असा जाब विचारला. ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. यावर सखोल चौकशी करुन गुन्हा दाखल होईल, असं उत्तर गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

केज तालुक्यातील केळगाव येथील आश्रमशाळेवर 18 वर्षांपासून विनावेतन नोकरी करणाऱ्या शिक्षकाने शनिवारी पहाटे बीड शहरातील स्वराज्यनगर भागात शिक्षण संस्थाचालकाच्या पतसंस्थेसमोर गळफास घेत आत्महत्या केली. त्यांनी आत्महत्येपूर्वी फेसबुकवर अनेक पोस्ट केल्या.

शेवटच्या पोस्टमध्ये त्यांनी संस्थाचालकांवर छळाचे आरोप करत त्यांच्यामुळे आत्महत्या करत असल्याचे म्हटले. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. आज विधान परिषदेत याच मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला घेरले.

अंबादास दानवे यांनी संस्थाचालकांवर गुन्हा का दाखल झाला नाही असा जाब



सरकारला विचारला तर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनीही हा मुद्दा उपस्थित करत, तात्काळ संस्थाचालकावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी सभागृहात केली. त्यानंतर, याप्रकरणी सखोल चौकशी करून गुन्हा दाखल होईल, असे उत्तर राज्याचे गृह (ग्रामीण) राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिले.

शिक्षक धनंजय नागरगोजे हे केज तालुक्यातील केळगाव येथील आश्रमशाळेवर कार्यरत होते. परंतु, मागील 18 वर्षांपासून त्यांना वेतन मिळाले नाही. अखेर त्यांनी हताश होऊन कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेडच्या केज शाखेजवळ आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी फेसबुकवर पोस्ट केली होती.

दरम्यान, धनंजय नागरगोजे ज्या शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते त्या केळगाव येथील आश्रम शाळेच्या संस्थाचालकांची प्रतिक्रिया समोर आली आहे. धनंजय नागरगोजे यांच्या आत्महत्येसाठी सरकार जबाबदार असल्याचा दावा या संस्थाचालकांनी केला आहे.

## योजनेचे पैसे दारूवर उडवले

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १७ :**

लाडकी बहीण योजनेचे पैसे दारूवर उडवल्याचा जाब विचारणाऱ्या पत्नीवर नवऱ्याने कोयत्याने हल्ला केल्याची भयंकर घटना सोलापूरच्या माढा तालुक्यात घडली. या घटनेत पीडित महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पती व सासूवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माढा तालुक्यातील कुडूर्वाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोणी गावात ही घटना घडली आहे. येथील एका महिलेने लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केला होता. या योजनेंतर्गत तिला दरमहा 1500 रुपये मिळतात. हे पैसे सदर महिला घरखर्चासाठी जपून वापरत होती. या योजनेचा तिच्या संसाराला मोठा हातभार मिळाला होता. पण तिच्या नवऱ्याला दारुचे व्यसन होते.

त्यामुळे तो अनेकदा या योजनेचे पैसे परस्पर काढून खर्च करत होता. यावरुन नवरा - बायकोत अनेकदा वाद होत. योजनेचे पैसे काढून परस्पर का खर्च केले? असा सवाल आपल्या नव?याला केला. त्याचा त्याला राग आला. त्याने रागाच्या भरात तिच्यावर कोयत्याने हल्ला केला. त्यात पीडित महिला गंभीर जखमी झाली.

# अवकाळी ग्रस्त शेतकऱ्यांचे थकीत देयक कधी देणार?

### पंकज भुजबळ यांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

अवकाळी ग्रस्त शेतकऱ्यांचे राहिलेले थकीत देयक 100 दिवसांच्या रोडमॅप कार्यक्रमाअंतर्गत वाटप पूर्ण करण्यात येणार येईल अशी माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.

राज्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीबाबत विधान परिषदेचे आमदार पंकज भुजबळ यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावरील उत्तरात मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी माहिती दिली.

आमदार पंकज भुजबळ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नात म्हटले आहे की, येवला तालुक्यासह नाशिक जिल्ह्यातील निफाड, सिन्नर, देवळा,नाशिक तालुक्यासह जिल्हाभरात विविध ठिकाणी जोरदार अवकाळी पावसाने शेतातील रब्बी पिकांचे मोठे नुकसान केले होते. यामुळे शेतातील गहू, कांदे, द्राक्षे, तूर, मका, कपाशी, हरभरा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकरी आजही मदतीपासून वंचित आहे.

त्यांना लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी केली. त्याचबरोबर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 28.82 कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचे वाटप कधी करण्यात येणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या प्रश्नाच्या उत्तरात मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील म्हणाले की,राज्यातील अवकाळी ग्रस्त शेतकऱ्यांचे थकीत देय वाटप करण्याची पूर्ण तयारी 100 दिवसांच्या रोडमॅप कार्यक्रमाअंतर्गत विभागाने केली आहे. यासंदर्भात निर्देशही देण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याची देय रक्कम थकीत राहणार नाही, याची खबरदारी घेऊ, असे आश्वासन त्यांनी दिले.

## हर्षवर्धन सपकाळांवर राणेंची तिखट टीका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोगल बादशहा औरंगजेबाशी तुलना केल्याप्रकरणी भाजप खासदार नारायण यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. हर्षवर्धन सपकाळ हा मूर्ख माणूस असून, त्याची काँग्रेस बुडवण्यासाठीच नियुक्ती झाली आहे, असे ते म्हणाले.

नारायण राणे यांनी सोमवारी खरपूस समाचार घेतला. औरंगजेब कोण होता? त्याच्याविषयी लोक काय म्हणतात? हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे त्या माणसाचा दाखला देत आताच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलणारा माणूस मूर्खच असला पाहिजे. त्यांना राज्यातील प्रश्न माहिती नाहीत. अध्यक्षपदाचा वापर कोणत्या विषयावर करायचा हे ही त्यांना माहिती नाही. त्यांची नियुक्ती काँग्रेस वाढवण्यासाठी नाही तर ती बुडवण्यासाठी झाली आहे, असे ते म्हणाले.

## अनेक प्रश्न असताना औरंगजेबाकडे लक्ष का?

### जितेंद्र आव्हाडांचा सरकारला सवाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

महाराष्ट्रात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, तरी सुद्धा औरंगजेबाकडे लक्ष का? असा सवाल आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

मुघलांची निशाणी असलेला लाल किल्लाही पाडून टाका, असे आव्हाड म्हणालेत. औरंगजेबाची कबर नष्ट करण्याच्या मागणीवर जितेंद्र आव्हाड यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. मुघलांची निशाणी असलेला लाल किल्लाही पाडून टाका, असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी लगावला आहे. औरंगजेबासारखा व्हिलन होता म्हणून शिवाजी महाराज हिरो झाले, असेही आव्हाड म्हणालेत.



राज्यभरात औरंगजेबाच्या कबरीविरोधात हिंदुत्ववादी संघटनांकडून आंदोलन केले जात आहे. विधानसभेतही हा मुद्दा गाजत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया देत सरकारवर हल्ला चढवला आहे.

महाराष्ट्रात नद्या वाहत आहेत, पाणी खूप आहे. कापसाला भाव मिळतोय, सोयाबीनला भाव मिळतोय. बेरोजगारांना नोकऱ्या मिळत आहेत. पगार वाढत आहेत आणि आता एकच विषय उरलाय तो म्हणजे औरंगजेब. महाराष्ट्रात अनेक विषय प्रलंबित आहेत. पण त्या विषयांकडे तुम्ही लक्ष देऊ नका. तुम्ही फक्त औरंगजेबाकडे लक्ष द्या, असा टोला आव्हाड यांनी सरकारला लगावला.

# अपक्ष खासदाराला खुली ऑफर

## तर सांगलीच्या विकासाला गती मिळेल : चंद्रकांत पाटलांनी टाकला डाव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**

भाजपचे आमदार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगलीचे अपक्ष खासदार विशाल पाटील यांना भाजपसोबत येण्याची जाहीर ऑफर दिली आहे.

विशाल पाटील आमच्यासोबत आल्यास केंद्रातील आमची संख्या वाढेल आणि सांगलीच्या विकासालाही गती मिळेल, असे चंद्रकांत पाटील म्हणाले. तर मला भाजप प्रवेशाची ऑफर येत असेल तर मी चांगले काम करतोय असे मी समजतो, अशी प्रतिक्रिया विशाल पाटील यांनी दिली. तसेच भाजप प्रवेशाबाबत माझा कोणताही विचार नसल्याचे ते म्हणाले.

राज्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका संपल्यानंतरही राजकीय पक्षांमध्ये नेत्यांच्या पक्ष बदलण्याचा सिलसिला सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे नेते आणि पुण्यातील माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत शिवधनुष्य हाती घेतले. त्यानंतर आता भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काँग्रेसमधून बंडखोरी करणारे सांगलीचे अपक्ष खासदार विशाल पाटील यांना भाजपमध्ये सामील होण्याची खुली ऑफर दिली आहे.

राजकारणात नेहमी वर्तमानावर चालावे लागते पुढे काय होईल माहित नाही, वर्तमान काळात त्यांच्या हाताशी अजूनही चार वर्ष दोन महिने आहेत. या कालावधीचा आम्ही विचार करतो, असे चंद्रकांत पाटील म्हणालेत. जर ते बरोबर आले तर आमची केंद्रातली संख्या देखील वाढते, सोबतच सांगली जिल्ह्यातील विकासाच्या कामाला त्यांना जे काय करायचे आहे. त्याला देखील सोपे जाईल, म्हणून आम्ही त्यांना जाहीर ऑफर पुन्हा एकदा देत आहोत, त्याचा त्यांनी विचार करावा, असेही चंद्रकांत पाटील यांनी म्हटले.

**ऑफरवर विशाल पाटलांची प्रतिक्रिया**

चंद्रकांत पाटील यांनी भाजपसोबत येण्याच्या ऑफरवर



खासदार विशाल पाटील यांनीही प्रतिक्रिया दिली. मी ज्या पद्धतीने संसदेत प्रश्न मांडतोय, ही चंद्रकांत दादांना माझ्या कामाची पद्धत आवडली असेल. मला सतत भाजप प्रवेशाची ऑफर येत असेल तर मी चांगलं काम करतोय असे मी समजतो, असे विशाल पाटील म्हणाले.

पण भाजप प्रवेशाबाबत मी कोणताही विचार करत नाही. मी आता कायद्यानेच दुस?या कोणत्याही पक्षात जाऊ शकत नाही. सर्व लोकप्रतिनिधींनी पक्ष गट तट बाजूला ठेवून सांगली जिल्ह्याच्या विकासासाठी विचार करतोय हे माझे धोरण आहे, असे विशाल पाटील यांनी सांगितले.

**सुमारे १ लाख मतांनी विजय**

पश्चिम महाराष्ट्रातील सांगली लोकसभा मतदारसंघात विशाल पाटील यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवून विजय मिळवला आहे. या मतदारसंघातून उद्धव ठाकरे गटाने चंद्रहार पाटील यांना आधीच उमेदवारी दिली होती. काँग्रेसचे विशाल पाटील यांची या मतदारसंघात दोन वर्षांपासून निवडणूक लढवण्यासाठी तयारी सुरू होती. विशाल पाटील बंडखोरी करत लोकसभेच्या रिंगणात उतरले आणि त्यांनी भाजपचे संजय काका पाटील यांचा पराभव केला. विशाल पाटील यांनी 5 लाख 71 हजार 666 मते घेत संजय काका पाटील यांचा १ लाखाहून अधिक मतांनी पराभव केला.

# कर्मचारी भरतीसाठी महाबँकेत आंदोलन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :**

शिपाई, क्लार्क यासह अन्य कर्मचाऱ्यांची भरती करावी, बँक व्यवस्थापनाने मनमानी कारभार थांबवावा, कर्मचाऱ्यांशी केलेल्या करारांचे पालन व्हावे, ग्राहकांस चांगल्या व सुरक्षित सेवा द्याव्यात, अशा विविध मागण्यांसाठी ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या वतीने सोमवारी महाबँकेचे मुख्यालय 'लोकमंगल'समोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या प्रसंगी फेडरेशनचे राष्ट्रीय सरचिटणीस कॉम्रेड देवीदास तुळजापूरकर, संघटन सचिव शैलेश टिळेकर आदी उपस्थित होते. ५१ झोनल ऑफिसमधील सुमारे ५०० पेक्षा अधिक कर्मचारी सहभागी झाले होते.

याच मागण्यांसाठी बँक ऑफ महाराष्ट्रचे देशभरातील कर्मचारी २० मार्च रोजी एक दिवसाच्या देशव्यापी संपावर जात आहेत. हा संप प्रामुख्याने सर्व स्तरातील



### २० मार्चला देशव्यापी संप

कर्मचा?यांच्या भरतीसाठी आहे. बँकेने २०२१ साली सफाई कर्मचारी हे पदच रद्द केले. हे काम आऊटसोर्स केले. त्यांना किमान वेतनदेखील दिले जात नाही. कायमस्वरुपी कामगारांचे फायदे जसे की रजा, मेडिकल, सुट्ट्या कांहीच मिळत नाही. या पदावर अनेक वर्षांपासून तात्पुरत्या पदावर काम करणारे हजारो कर्मचारी यामुळे रस्त्यावर आले आहेत.

बँकेत ७०० पेक्षा अधिक शाखेतून नियमित शिपाई नेमण्यात आलेले नाहीत. बँकेत ३१८ शाखा आहेत जेथे एकही क्लार्क नेमण्यात आला नाही. १२९० शाखा आहेत जेथे केवळ एक क्लार्क आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना वेळ संपली, तरी जास्त वेळ बसून काम पूर्ण करून जावे लागते. सुट्टीच्या दिवशी कामावर यावे लागते. आजारपण असो की सांसारिक जबाबदाऱ्या यासाठी आवश्यकतेनुसार रजा मिळत नाही. काम आणि वैयक्तिक आयुष्य यातील समतोल बिघडला आहे. कर्मचारी सतत ताण-तणावात काम करत आहेत. त्यामुळे सतत आजारी पडत आहेत. याचा ग्राहकसेवेवर विपरीत परिणाम होत आहे.

एकीकडे ग्राहकांची संख्या वाढते आहे, त्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत तर दुसरीकडे कर्मचा?यांची संख्या मात्र कमी झाली आहे. यासाठीच कर्मचा?यांचा आग्रह आहे की, बँकेने त्वरित सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांची पुरेशी भरती करावी, जेणेकरून समाधानकारक ग्राहकसेवा देता येऊ शकेल.

याशिवाय कमी कर्मचाऱ्यात अधिक काम, यात बँकेचे नियम काटेकोरपणे पाळल्या जात नाहीत. त्यातूनच फ्रॉडस होण्याची शक्यता निर्माण होते, नव्हे होत आहेत. यात बँकेचे तसेच ग्राहकांचे नुकसान होत आहे. याला जबाबदार कोण? बँक यावर संवेदनशील नाही म्हणूनच २० मार्चला महाबँकेत संप अटळ बनला आहे.

याशिवाय बँक कर्मचारी संघटनांशी केलेले कायदेशीर करार, हायकोटार्चे आदेश सगळेच धाब्यावर बसवून बँक व्यवस्थापन मनमानी करत आहे. यामुळे कर्मचाऱ्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे. ग्राहकांनी आमची भूमिका समजून घ्यावी आणि आमच्या संपाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन कॉम्रेड देवीदास तुळजापूरकर यांनी केले.

महासागर

●मंगळवार,दि.१८ मार्च २०२५

अकोला पान 3

# अकोल्यात शिकायचे असेल तर पैसे द्या; बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना दमदाटी

**अकोला :** शिक्षणाची पुरेशी सोय नसल्याने अनेक विद्यार्थी शहरात शिक्षणासाठी येत असतात. तर बरेचजण खासगी क्लाससाठी येत असतात. मात्र अकोल्यात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांबाबतीत वेगळाच प्रकार घडत असनू अकोल्यात शिकायचं असेल तर पैसे दे', अशा पद्धतीने काही टवाळखोर तरुण बाहेरगावच्या विद्यार्थ्यांसमोर असा तगादा अर्थातचं पैशाची मागणी करत आहेत. मागील काही दिवसांपासून हे प्रकार वाढले आहेत.महाविद्यालयीन शिक्षण तसेच खासगी क्लाससाठी अनेक विद्यार्थी बाहेर गावाहून अकोला शहरात येत असतात. मात्र या विद्यार्थ्यांना त्रास दिला जात असल्याचे धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या विद्यार्थ्यांना दमदाटी करत चक्क पैशांची मागणी केली जात आहे.

असाच प्रकार पुन्हा समोर आला आहे. अकोला जिल्ह्यातील सांगळुद येथील तीन विद्यार्थी शिकवणी क्लास करून रस्त्याने जात असताना काही टवाळखोरांनी विद्यार्थ्यांना अडवत पै मागणी केली.

**थेट केला चाकू हल्ला**

दरम्यान या विद्यार्थ्यांनी पैसे न दिल्याने टवाळखोर तरुणांनी विद्यार्थ्यांवर चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांचा हल्ल्याचा प्रयत्न फसला आणि घटनास्थळावरून या टवाळखोरांनी पळ काढला. सिव्हिल पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली असून या प्रकरणात विद्यार्थ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

## रामदास पेठ पोलिस स्टेशन परिसरात

# लुटमारांचा हैदोस, एकाचा जीव धोक्यात

■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** रविवारी रात्री भुरट्या चोरांबरोबर लुटारूंनी डोकेवर काढल्याचे चित्र होते. तीन पैकी एका प्रकरणात रेल्वे स्थानकावर पत्नीचे मंगळसुत्र हिसकावणाऱ्या चोरट्याने नवऱ्यावर जीवघेणा हल्ला केला.त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे. रविवार, १६ मार्च रोजी रात्री १० वाजता अकोला रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर अकोट-अकोला मेमो ट्रेनमध्ये एका धक्कादायक घटना उजेडात आली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अंबिका नगर मलकापूर येथील रहिवासी हेमंत उमेश गावंडे यांनी त्यांच्या पत्नीचे सुमारे सव्वा लाख रुपयांचे मंगळसूत्र घेऊन पळणाऱ्या आरोपीचा पाठलाग केला.

आरोपीने हेमंतवर जीवघेणा हल्ला केला आणि दगडांनी त्याचा चेहरा गंभीररित्या ठेचला. दरम्यान, पोलिसांनी आरोपीचा फोटो रिलिज करत त्याचा शोध घेणाऱ्याला बक्षीस जाहिर केले आहे. रात्री घटनेची माहिती मिळताच शहरातील एसडीपीओ सतीश कुलकर्णी, रामदासपेठचे ठाणेदार मनोजबहुरे, जीआरपीच्या ठाणेदार अर्चना



जखमी हेमंत गावंडे

गाढवे आणि फॉरेन्सिक विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी हेमंतला जिल्हा शासकीय रुग्णालय आणि नंतर एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुन्हेगाराला पकडण्यासाठी पथके तयार केली आहेत. रेल्वे स्थानक परिसरात गुंडांवर अंकुश ठेवण्याची मागणी होत आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीचा फोटो जारी केला आहे आणि त्याला पकडण्यासाठी बक्षीसही जाहीर केले आहे.

तर दूसऱ्या एका घटनेत उस्मान आझाद हायस्कूलच्या परिसरात उस्मुद्दीन आलम



नावाचा व्यक्ती रात्रीचे जेवण करून हॉटेलम धून बाहेर पडत असताना अज्ञात आरोपींनी मारहाण करत सहा हजार रुपये लुटले. तिसऱ्या एका प्रकरणात एकाची जुनी तार फैल परिसरात रहिवासी अरविंद वाघमारे यांना मारपीट करत त्यांच्याकडील दोन हजार हिसकावून घेतल्याची माहिती समोर आली आहे. रामदासपेठ पोलिसांनी दोन्ही जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असून, दोन्ही घटनांचा तपास रामदासपेठ पोलीस करत आहेत.

## वनविभागाच्या छाप्यात पोपट केले जप्त

### अकोला ढोर बाजारात केली कारवाई

■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** येथील ढोर बाजारात वन अधिका-यांनी कारवाई करून ६ बंदिस्त पोपट जप्त केले. रविवारी कारवाई करण्यात आली. पोपटाची जागा निसर्ग समतोलासाठी निसगीतच हवी म्हणून आरएफओ विश्वास थोरात व वनपाल गजानन गायकवाड यांना पोपट बाजारात असल्याची माहिती दिली. वनरक्षक सुधाकर मुंडे, मानद वनजीव रक्षक बाळ काळणे, अनिल चौधरी, तुषार आवारे व निसर्ग प्रेमी राजेश प्रधान हे घटनास्थळी पोहोचले. तेव्हा, नियमबाह्य पोपट विक्रेते पिंजरे सोडून गेले. वन विभागाने पोपट ताब्यात घेतले. तसेच लोकांना पोपटांचे नियम सांगून हा वनगुन्हा आहे. असे मार्गदर्शन करून सक्त ताकीद दिली. बाजाराकडे वनविभागाचे लक्ष राहणार आहे. तसेच पक्षी विक्रेत्यावर कडक कारवाई केली जाईल असा इशारा दिला. ढोर बाजार, दाना बाजार या ठिकाणी पोपट, तितर, बटेर तसेच काही वेळा घोरपड देखील विक्री साठी आणली जायची. परंतु वन विभाग सतर्क झाल्यामुळे खुल्या वरील वन्य प्राण्यांची विक्री कमी झालेली दिसते.

## उन्हाचा धोका टाळण्यासाठी

# 'डू अँड डोन्टस'चे पालन करण्याचे आवाहन

■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** प्रादेशिक हवामान विभागाच्या नागपूर केंद्रात जिल्ह्यात पुढील काळात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नागरिकांनी उन्हाचा धोका टाळण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

**काय करावे**

तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी प्यावे. हलके, पातळ, सच्छिद्र सुती कपडे वापरावे. बाहेर पडताना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट, चपला वापराव्यात. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. उन्हात काम करताना टोपी, रूमाल, दुपट्टा वापरावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरची लस्सी, ताक, कैरीपाणी, पन्हे, निंबूपाणी आदींचा वापर करावा. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम आदी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत. चक्कर आल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. पशुधन, पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवावे. त्यांच्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर, सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. कार्यालयांनी थंड पेयजलाची व्यवस्था ठेवावी. गरोदर महिला, काम गार, आजारी कामगारांची अधिक काळजी घ्यावी.



उष्माघाताची लक्षणे दिसताच दवाखाना गाठावा.

**काय करूनये**

लहान मुले, तसेच पाळीव प्राण्यांना दरवाजे बंद असलेल्या वाहनात. तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नका. दु. १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाकाची कामे टाळावीत. मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे, खिडक्या उघड्या ठेवाव्यात. उच्च प्रथिनयुक्त आहार व शिळे अन्न खाऊ नये. मद्यसेवन, चहा, कॉफी, काबीनेटेड सॉफ्ट ड्रिंक घेऊन नये. त्यामुळे निर्जलीकरण होऊ शकते. उन्हात वाहने चालवू नयेत. ज्वलनशील पदार्थांपासून शक्यतो दूर राहावे.

# न्याय मागण्यासाठी शिक्षकांचे लक्षवेध आंदोलन

■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** राज्यातील शिक्षण आणि शिक्षकांच्या समस्या न सोडवता नव्याने त्या निर्माण केल्या जात आहेत. वारंवार आश्वासन देऊनही आश्वासित मागण्यावरील निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याने राज्यातील शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष आहे, निवडणुकीनंतर शालेय शिक्षण मंत्री म्हणुन पदभार घेतल्यापासून शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकदाही स्वतंत्र बैठक मंर्त्यानी घेतली नाही व समस्यांचे निराकरण ही केले नाही त्यामुळे राज्यातील शिक्षकांम ध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाल्याचा आरोप विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ.अविनाश बोर्डे यांनी केला आहे.

सोमवार दि.१७ मार्च ला विज्युक्टा व महासंघाच्या आदेशानुसार राज्यभर तालुका,जिल्हा व विभागावर शिक्षकांच्या न्याय मागण्यांकडे लक्ष देण्याकरता 'लक्षवेध' आंदोलन करण्यात आल्याचे महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर यांनी म्हटले आहे यानंतरही लक्ष दिले नाहीत तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघटनेने दिला आहे.



त्यानुसार आज शिक्षणाधिकारी/ जिल्हाधिकारी यांचे कार्यालयासमोर लक्षवेध धरणे आंदोलन करण्यात आले व जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यांचे सह जिल्ह्यातील शेकडो शिक्षक सहभागी झाले होतेडॉ अविनाश बोर्डे प्रा संतोष अहिर प्रा डी एस राठोड प्रा प्रवीण ढोणे प्रा श्रीराम पालकर प्रा पंकज वाकोडे प्रा अविनाश काळे प्रा संजय गोळे , डॉ विजय चव्हाण प्रा प्रफुल्ल डोंगरे प्रा भास्कर काळे प्रा सौ विद्या ठाकरे प्रा दिपाली भुईभार प्रा स्वाती बारबदे प्रा शितल ताथोड प्रा संतोष अंधारे डॉ सौरभ म्हात्रे रामेश्वर राठोड डॉ मो नदीम मो शमीम प्रा संदीप बाहेकर प्रा विठ्ठल पवार प्रा केशव उन्हाळे पंकज वाघमारे जयदीप कुलकर्णी वासुदेव डांगे प्रा हसन कामनवाले प्रा शाफिकुर रहमान नंदकिशोर थुटे अतुल पिलात्रे नितीन बोचरे सतीश अनासने संघमित्र मोरे गोपाल साबळे , बी एम बडवे, दिलीप अमुरकर, अशोक राहटे आदींसह बहुसंख्येने शिक्षक वृंद उपस्थित होते.

## संजय गांधी व श्रावण बाळ निराधार योजनेतील

# लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे

■**बार्शिटाकळी,दि १७ (प्रतिनिधी):** बार्शिटाकळी तालुक्यातील सर्व संजय गांधी योजना व श्रावण बाळ योजना लाभार्थी यांनी सदर योजनांचे मिळणारे मासिक अनुदान अप्राप्त असल्यास तात्काळ आधार प्रमाणीकिकरण करणेकरिता आपले जवळचे महसुल मंडळ बार्शिटाकळी, महान, पिंजर, धाबा, राजंदा, खेर्डा येथे उपस्थित राहून आधार प्रमाणीकिकरण पुर्ण करून घेणेबाबत तहसिलदार बार्शिटाकळी यांनी आव्हान केलेले आहे.उन्हाची तिव्रता जास्त वाढत असल्याने तालुक्यातील दिव्यांग व वृध्द लाभार्थी यांनी तालुक्यातील गावातून आधार प्रमाणीकीकरण करणे करिता तहसिल कार्यालयात न येता जवळचे महसुल मंडळात आधार व ओटीपी करिता मोबाईल सह आधार प्रमाणीकिकरण पुर्ण करून घ्यावे. जेणेकरून डिबीटीव्दारे मिळणारे मासिक अनुदान गरीब लाभार्थी यांना नियमीत मिळेल. डिबीटी व्दारे मिळणारे मासिक अनुदान हि शासनाची महत्वकांक्षी योजना असल्याने सर्व लाभार्थी



यांनी तात्काळ : आधार प्रमाणीकिकरण पुर्ण करून घ्यावे. तसेच ज्या लाभार्थी यांचे आधार व मोबाईल क्रमांक सलग्न नसल्यास आधार केंद्रामार्फत सदर आधार अपडेट करून वरील प्रमाणे आधार प्रमाणीकिकरण प्रकिया पुर्ण करावे. ब-याच वेळा इंटरनेट व आधार प्रमाणीकिकरण वेबसाईट बंद असल्याने तालुक्यातील दुरच्यागावातील लाभार्थी यांनी तहसिल कार्यालयात येवू नये जेणेकरून सदरचे काम न झाल्यास लाभार्थी यांना विनाकारण त्रास होऊ शकतो करिता लाभार्थी यांनी जवळचे मंडळस्तरावर बार्शिटाकळी, महान, पिंजर, धाबा, राजंदा, खेर्डा येथे संबंधीत मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांना संपर्क करून आधार प्रमाणीकिकरण प्रकिया तात्काळ पुर्ण करावे.

## थोडक्यात

### गुढीपाडव्याला स्वागत यात्रेचे आयोजन

**अकोला :** नववर्ष स्वागत यात्रेच्या नियोजनासाठी स्थानिक समर्थ पब्लिक स्कूल मध्ये संस्कृती संवर्धन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने चैत्र शुद्ध प्रतिपदा, शके १९४७ रविवार दि. ३० मार्च २०२५ रोजी भव्य हिंदू नववर्ष शोभयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे. हिंदू नववर्ष स्वागत यात्रा कार्यकारिणीच्या समितीची बैठकीत समितीचे कार्य वाढीच्या दृष्टीने स्वागत यात्रा समितीच्या अध्यक्षपदी अरविंद देठे, उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, डॉ अभिजीत नालट, डॉ प्रवीण चव्हाण, मंगेश वानखडे,रामप्रकाशजी मिश्रा यांची घोषणा संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी केली. आजच्या बैठकीत समितीचे महेश जोशी यांनी संस्कृती संवर्धन समितीच्या कार्याबद्दल विस्तृत माहिती दिली तसेच या बैठकीत येणाऱ्या हिंदू नववर्ष स्वागत यात्रेच्या आयोजना बाबत सखोल चर्चा करण्यात आली. प्रा. नितीन बाठे यांनी अध्यक्षीय भाषणात भारतीय संस्कृती समाजामध्ये रुजवणे हे आपले कर्तव्य असून नवीन पिढीला आपल्या पुरातन संस्कृतीची ओळख होणे गरजेचे आहे असे सांगून हिंदू नववर्ष स्वागत यात्रेत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. या प्रसंगी रा.स्व.विभाग संघचालक नरेंद्र देशपांडे, डॉ आर बी हेडा, संस्कार भारतीचे चंदाताई जयस्वाल, आशा खोकले, पुरुषोत्तम मलानी, नीलेश देव विनोद जकाते, महेश जोशी, समीर थोडगे, स्वानंद कोंडोलिकर, शरद वाघ, पंकज सादराणी, सोनल ठक्कर, रश्मी कायंदे, रश्मी कायंदे, सुरज वाडेकर, निनाद कुलकर्णी, पुष्पा वानखडे, चित्रा बापट, प्रशांत पाटील, रुपेश वाखारकर कपिल सरोदे यांच्यासह अकोला शहरातील नामवंत मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती.

## बहुजन नायक कांशीरामजी यांची ९१ वी जयंती मोठया उत्साहात साजरी



■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** भगवान रविदास काम्युनिटी फेडरेशन व राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने १६ /३/२५ रोजी महारुद्र हनुमान प्रांगणा मध्ये बहुजन महानायक कांशीरामजी यांची ९१वि जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ विजय काकडे, मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. गजानन वजिरे. प्रमुख वक्ते म्हणून श्रीराम राखोंडे, पांडुरंग वाडेकर.रामभाऊ ताजने. प्रविण चोपडे जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ अकोला हे होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर वानेडकर यांनी केले प्रमुख उपस्थिती म्हणून महादेव कळसकर महादेव पद्मने शिवाजी चीमकर,निरंजन गव्हाळे,रामराव डामरे प्रल्हाद शेकोकार लक्ष्मण पद्मने महादेव इंगळे, विश्वनाथ ठोंबरे, गजानन काकडे, ईशान चापके, विष्णू वाडेकर पद्माकर कळसकर ओंकार चिमणकर जगदेव टाले पुंजाजी शेगोकार दिगंबर देवकर, विनोद काकडे गोविंदा चोपडे मनोहर टाले व बराच जनसमुदाय उपस्थित होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालनडॉ आप्पा साहेब डांबरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सेवानिवृत्त मुख्याध्यापक राम शेगोकार यांनी केले.

## स्वच्छतेसंदर्भात नाटिका सादरीकरण

**पारस :** स्वच्छ भारत अभियान २.० उद्दिष्ट पूर्ततेच्या अनुषंगाने माहिती, शिक्षण व प्रसार या घटकांतर्गत स्वच्छते संदर्भात जनजागृती करण्यात येत आहे. ही मोहीम संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. त्यांचीच एक टीम पारस मध्ये आली असता त्यांनी संत गजानन इंग्लिश मीडियम स्कूल पारस येथील विद्यार्थ्यांना स्वच्छते संदर्भात जनजागृती पर नाटिका सादर करून स्वच्छतेचे धडे दिले. यावेळी स्वच्छता किती महत्त्वाची आहे व आपण स्वच्छता न पाळल्यास आपल्याला किती मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल याची सुद्धा प्रात्यक्षिक मुलांना करून दाखवले. म्हणून आपण आपले घर आपला परिसर आपली शाळा व प्रत्येक सार्वजनिक ठिकाणची जबाबदारी ही आपली सुद्धा आहे.त्याचे भान ठेवून आपण स्वच्छता ठेवली पाहिजे असा संदेश सुद्धा एवढी विद्यार्थ्यांना देण्यात आला.

# जलसंपदा विभागातर्फे जलजागृती सप्ताहाची सुरुवात




■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** जलसंपदा विभाग, अकोला सिंचन मंडळ, अभियंता व वास्तुविशारद संघटना व इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जलजागृती सप्ताहाचा शुभारंभ रविवारी येथे झाला. पाण्याचा उचित वापर, तसेच जल पुनर्भरणाबाबत या सप्ताहाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

अकोला सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता यो.रा. दाभाडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कृषी तज्ज्ञ डॉ. सुभाष टाले, पाणी फाऊंडेशनचे सदस्य एन.एम.राठोड, कार्यकारी अभियंता सा.वि. सानप, उपविभागीय अभियंता अे.ओ.मालोकार आदी उपस्थित होते. जल पुनर्भरणाच्या माध्यमातून पाणी जमिनीत जिरवले गेले पाहिजे. पाण्यासंबंधी शासनाच्या कल्याणकारी योजनांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. गावे जलसमृद्ध होण्यासाठी पाणी वापर संस्थांनी योग्य नियोजन करून लोकसहभाग वाढवावा, असे आवाहन श्री. दाभाडे यांनी यावेळी केले. पृथ्वीतलावर अनेक महत्त्वपूर्ण संसाधनांत पाणी हे सर्वश्रेष्ठ संसाधन आहे. मनुष्य हा अन्नावाचून काही दिवस जगेल, मात्र पाण्यापासून जगणे अत्यंत अवघड आहे. पाणी ही निसर्गाने दिलेली अत्यंत महत्त्वाची अनमोल अशी देणगी आहे.

त्याचा जपून वापर होणे आवश्यक आहे, असे डॉ. टाले यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते जलजागृती रथाला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. यावेळी जलसाक्षरतेची शपथही घेण्यात आली. दीपिका गावंडे यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा समन्वयक सुधीर सरकटे, जलप्रेमी तुषार हांडे, जलप्रेमी किरण हिवराळे आदी उपस्थित होते.

# संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी विहिप ने केले आंदोलन

■**अकोला,दि १७ (प्रतिनिधी):** उजबेकी, परकीय आक्रमक बाबर यांचा वंशज क्रूरकर्मा औरंगजेब याची कबर संभाजीनगर येथे आहे. वास्तविक क्रूरकर्मा औरंगजेब हा अहिल्यानगर येथे वारला. नंतर त्याचे प्रेत काढून ते प्रेत संभाजीनगर येथे पुरून त्या ठिकाणी कबर बांधण्यात आली. याच औरंगजेबाने गुरुतेग बहादूर यांची क्रूर हत्या केली होती. तसेच शीख गुरू गुरु गोविंदसिंग यांच्या दोन बालकांची केवळ ते मुस्लिम होत नाहीत म्हणून जिवंतपणे भिंतीत चिरून निर्घृण हत्या केली.या पापी क्रूर औरंगजेबाने भारतातील अनेक धार्मिक स्थळे नष्ट करून त्यांचे पावित्र नष्ट केले.म्हणून अशा पातकी, क्रूर औरंगजेबाची कबर संभाजीनगर येथून त्वरित हटवण्यात यावी या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद बजरंग दल अकोला शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय समोर सोमवारी एक दिवशीय धरणे आंदोलन राबविण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.औरंगजेबाने अनेक धार्मिक स्थळे उध्वस्त केली.सामूहिक






कतलेआम करण्यात आला,छत्रपती संभाजी, छत्रपती शाहू महाराज यांचे धर्म परिवर्तन करण्यासाठी जोमाने प्रयत्न करण्यात आला. अशा क्रूरकर्मा, पापी, विध्वंसक औरंगजेबाची कबर वा स्मारक स्वतंत्र भारतात गुलामी व यातनांचे प्रतीक आहे.सबब ही कबर उखडुन, फेकून टाकावी. अन्यथा विहीप बजरंग दलच्या वतीने संभाजीनगर येथील औरंगजेबाची ती कबर स्वतःहून उखडुन टाकण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनात देण्यात आला. यावेळी बजरंग दल विदर्भ प्रांत सह संयोजक सुरज भगेवार,बजरंग दल विभाग संयोजक हरिओम पांडे,विहिंप जिल्हाध्यक्ष प्रकाश लोढिया,प्रांत सहमंत्री गणेश काळकर, प्रांत गोरक्ष प्रमुख अतुल आयचीत, जिल्हा कोषाध्यक्ष अमर कुकरेजा, विहिंप विभाग मंत्री संजय दुबे,जिल्हा मंत्री निलेश पाठक,विभाग समरसता प्रमुख संदीप निकम,जिल्हा सहमंत्री रोशन जैन व सुनील देशपांडे,सत्संग प्रमुख प्रताप विरवाणी, बजरंग दल जिल्हा संयोजक प्रेम आमकर,सहसंयोजक आकाश ठाकरे, विजय डहाके,प्रकाश दांडगे, संतोष बुरडे, प्रकाश घोगलिया,गोपाल राजवैद्य, संजय तिवारी, पवन कुलकर्णी, रविंद्र फ्फाटे, आनंदकंद महाराज, राहुल कानडे, नागेश इंगळे, प्रमोद दुबे, हिरा गायधने, वंश शर्मा, आदित्य शर्मा, प्रतीक भानुषाली,योगेश भानुषाली,यश लोहिया, सुपेश जोशी, हरीओम राजपूत, कपिल बुंदेले, सोनू पंड्या, गणेश मिश्रा, मुन्ना शाहू, कुणाल धाकटे, पवन पांडे, लखन बागडे, विजय मिश्रा,अतुल टोंगसे, सागर सप्रे, प्रशांत क्षीरसागर, प्रशांत कदम, सुनील पाल, निखिल पवार, संतोष पाटील,धीरेंद्र झापर्डे, कैलास रणपिसे, सुमंत तराडकर,ऋषिकेश ताथोड, रेखा नालाट, चित्राताई बापट, तनिषा अंभोरे, निशा गॅरल, पुष्पाताई वानखडे, स्वानंदी पांडे, चंदाताई ठाकूर,निशाताई कढी, निता बागडे, साधना येवले, छाया तोडसाम, मालती रणपिसे, आदि शेकडो कार्यकर्ता उपस्थित होते.

जगाच्या पाठीवर आज कृत्रिम बुद्धिमत्ता किती विनाश करेल, ढासळलेलं शेअर मार्केट किती जणांना गार करून टाकेल, बेरोजगारीचं भयावह रुप कोणत्या दिशेला घेऊन जाईल, असे नव्हे, तर शेकडो आव्हानांचे संकट आहे. अलीकडील काळात हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून जाईल असे यथार्थ आणि शिवरायांच्या इतिहासाने बलशाली झालेल्या गौरवशाली परंपरेचं वर्णन महाराष्ट्राचं केलं जातं त्या महाराष्ट्रात औरंगजेब आणि त्याची कबर चर्चिली जात आहे. चारशे वर्षापूर्वीचा क्रूर औरंगजेब चालू घडामोडीत आल्याने वाऱ्याची दिशा होकायंत्रालाही सुद्धा कळणार नाही, अशी स्थिती महाराष्ट्राची झाली आहे. तमिळनाडू सरकारने तैवानमध्ये एक विशेष कार्यालय उघडले आहे. तिथले अधिकारी चिनी भाषा बोलतात, उद्योजकांना मदत करतात आणि तमिळनाडूमध्ये उद्योग उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळवून देतात. तिथलं सरकार उद्योगधंदे, रोजगार, आणि जागतिक स्तरावर राज्याचा विकास यावर लक्ष केंद्रित करतं आणि आपले महाराष्ट्र सरकार? इथे दररोज औरंगजेब जिवंत होतो. कधी विधानसभेत, कधी कनकवलीत! सरकारच्या योजना कोणत्या? मल्हार सर्टिफिकेट, झटका-हलाल प्रमाणपत्र आणि धार्मिक घोषणा. रोजगार निर्मिती, गुंतवणूक, किंवा उद्योग धोरणांवर चर्चा करायला कुणालाच वेळ नाही. महाराष्ट्र शासनाने आता अफगाणिस्तानमध्ये आपले ऑफिस काढावे. तिथे धार्मिक तणाव वाढवण्याच्या सल्लागार सेवा द्याव्यात. जगभरच्या धार्मिक कट्टरतावाद्यांसाठी 'महाराष्ट्र कन्सल्टन्सी' सुरू करावी! कारण सरकारचा भर केवळ धार्मिक राजकारणावर दिसत आहे. आर्थिक विकास, गुंतवणूक, आणि रोजगाराच्या संधी याकडे सरकारचं अजिबात लक्ष नाही. राज्याची अर्थव्यवस्था डबघाईला येत असताना, उद्योग बाहेरच्या राज्यांत जात असताना, सरकार काय करते? शासकीय निधी फक्त त्यांनाच मिळेल, जे सत्ताधाऱ्यांना मत देतील, असे मंत्र्यांनी उघडपणे सांगितले. उद्योग, उत्पादन, निर्यात, कृषी क्षेत्र याचा सरकारला विसर पडलेला आहे. म्हणजे महाराष्ट्र आता राजकीय लाचारीवर चालतो असे दिसते. मग महाराष्ट्राचा विकास कोण करणार? सोन्याचा धूर पुन्हा यायचा असेल, तर धमार्चा धूर उंबरठ्याच्या आत ठेवायला हवा. निर्यात आयातीपेक्षा कितीतरी पट वाढवायला हवी. तमिळनाडू सरकार उद्योगधंद्यांना चालना देण्याचा विचार करतं आणि आपलं सरकार औरंगजेब, भोंगे, हलाल, झटका, मटका यावर घाम गाळतं.

# महाराष्ट्राचा कारभार कोण चालवतो?
# राज्यकर्ते की धार्मिक एजंट?

इतिहास हा स्मृतींवरील ओझं नाही, तर आत्म्याचा प्रकाश आहे. भारतात मात्र गेल्या काही दिवसांपासून इतिहासाच्या स्मृती ओझं वाटू लागल्या आहेत. देशात सातशे आठशे वर्ष सोडाच, पण हजारो वर्षांचा इतिहास खणून काढला जात आहे.

अठरापगड जातींना घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवताना शिवरायांनी आया बहिणींचा सन्मान केलाच, पण स्वराज्यातील बळीराजाच्या भाजीच्या देठाला सुद्धा हात लावायचा नाही, असा आदेश आपल्या मावळ्यांना दिला. त्यांनी शत्रूचे शत्रुत्व संपल्यानंतर त्यांना दफण करण्यासाठी जागाही देऊ केली, म्हणून प्रतापगड आजही शिवरायांच्या युद्ध नैपुण्याची प्रेरणा देतो.

काळाच्या कैकपटीने पुढे जाऊन विचार करणारी थोरवी आपल्या राजा शिवछत्रपतींची आहे. औरंगजेब सुद्धा याच मातीत गाडला गेला. मात्र, त्याची कबर आता चर्चेत आली आहे. कोणत्याही युगपुरुषाचा इतिहास हा त्याचा विरोधक किती क्रुर होता यावरून महती सांगते. जसा औरंगजेब क्रूर समजला जातो, तसाच जगाच्या इतिहासात आजही हुकूमशाहीचे वर्णन करण्यासाठी हिटलरचा दाखला दिला जातो. दहा लाखांहून अधिक मानवी कत्तली करणाऱ्या हिटलरच्या स्मृती आजही जगावर राज्य केलेल्या युरोपमध्ये जपल्या गेल्या आहेत. त्या कोणत्याही उदात्तीकरणासाठी नाही, तर त्याची मानवी क्रूरता किती भयावह होती याची साक्ष देण्यासाठी आणि नव्या पीढीला शिक्षित करण्यासाठी आहेत.

हिटलरच्या छळछावण्या, कत्तलीचे गॅस चेंबर अजूनही त्यांनी जपून ठेवताना स्मारक केली आहेत. पण आपल्याकडे मात्र जुन्या कबरी उध्वस्त करण्यासाठी नव हिंदुत्ववाद्यांची मोठी फौज कामाला लागली आहे. मेंदूची आणि त्यांची फारकत असावी असेच वाटू लागले आहे. इतिहासाचे कोणतेही ज्ञान नसल्यामुळे असे उद्योग ते सुरू करतात त्यामुळे त्यांचे जे कोणी 'आका' असतील त्यांना खुश करण्याच्या पलीकडे त्यांचा हेतूही काही नसतो.

छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा फक्त मुसलमानांशी होता व त्यांच्या सैन्यात कुणीही मुसलमान नव्हते, असा जावई शोध भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी लावला. त्यावेळी किमान भाजपच्या ज्येष्ठांनी त्यांना रोखायला हवे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या फौजेत अठरा पगड जातीचे आणि इतर धर्मीय सुद्धा इमाने इतबारे स्वराज्याची शपथ घेऊन छत्रपतींच्या फौजेत दाखल झाले होते. त्यांनी कधीही छत्रपती शिवरायांशी गद्दारी केल्याचा उल्लेख इतिहासात दिसून येत नाही.






### तरूणांना सजग करावेच लागेल

ज्यांना कोणाला भोंगे लावायचे तर खुशाल लावू द्या, ज्यांना कोणाला काय वाचायचे तर खुशाल वाचू द्या, ज्या कोणाला दंगली करायच्या असतील तर खुशाल करू द्या, पण शिक्षणावरुन लक्ष विचलीत होवू देवू नका. शिक्षण हाच तुमच्या उद्धाराचा मार्ग आहे. तुम्ही चांगले शिकून सवरून स्वतःचे आयुष्य घडविले तर आई वडिल, नातेवाईक व समाज यांना मदतीचा हात देवू शकता. तुम्ही सनदी सेवा, पोलिस सेवा, महसूल सेवा अथवा खाजगी उद्योगात इंजीनीयर, मॅनेजर, तंत्रज्ञ म्हणून लागलात तर तेथील सिस्टिम समजून येते व आपण काय करु शकतो याचा अंदाज देखील येतो. तुम्ही वकील, डॉक्टर, सीए झालात तर न्यायव्यवस्था, आरोग्य व्यवस्था, आर्थिक व्यवस्था यांचा आपोआप अभ्यास होईल. शिक्षक, प्राध्यापक झालात तर विज्ञानवादी नवसमाज घडवाल. तुम्हाला भारत देशाचे आदर्श नागरिक म्हणून नावारुपास यायचे आहे. हे भोंगे लावणे, जातीय दंगली करणे त्यांनाच करू द्या, ज्यांनी अनेकांना हजारो वर्षे शिक्षणापासून मुद्दाम वंचित ठेवले होते. आज तेच समाजाला विध्वंसाच्या मार्गावर नेत आहेत. म्हणून तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आलेली आहे, ती म्हणजे चांगले शिकून सवरून भारतीय संविधानाचे रक्षण करायचे व संसदीय लोकशाही टिकवायची. कारण या देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे. यासाठीच तुम्ही उच्च शिक्षण घेवून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत देश निर्माण करा!

### लेखणीची धार आणखी तेज होईल?

अलिकडे सरकारच्या बाजूने असाल तर वेगळा कायदा आणि विरोधात बोलत असाल तर वेगळा न्याय. पक्षपाती सरकारमुळे कोश्यारी प्रवृत्ती कधी समोरासमोर तर कधी पडद्यामागुन बहुजनांच्या महापुरुषांची बदनामी करण्याचे उद्योग सतत करत असते. बहुजन समाजाच्या कमी बुद्धीच्या व हलक्या मेंदूच्या अशा तरुणांना सध्या धमार्ची अफू देण्याचं काम जोरात सुरु आहे. त्यांची माथी भडकावून सत्तेच्या छत्रछायेत हे सर्व सुरु आहे. सत्तेचा माज आहे बाकी काय? सत्ता आज आहे, परंतू कधी ना कधी जाणार आहे हे नक्की. परंतू या विषारी कोश्यारी प्रवृत्तीला वाढविण्यात सर्वसामान्य बहुजनांचा मोठा वाटा आहे, हे मात्र मान्य करण्यास हरकत नसावी. 'चिल्लर' बिनडोक तरुणाला व त्याच्या वाह्यात बोलण्याला काडीची सुद्धा किंमत द्यायला नको आहे आणि त्याला घाबरण्याचे सुद्धा कारण नाही. मतपेटीतून काहीही निर्णय येत असोत, परंतू लोकशाहीवर विश्वास असणारा व सत्तेच्या नशेत बेधुंद विध्वंसक शक्तीशी लढाणारा एक मोठा वर्ग आजही या देशात हुकूमशाही विरोधात छाती ठोकून उभा आहे. अशा बेअक्कल प्रवृत्तीला भीक न घालता लेखणीची धार आणखी तेज होईल अशी अपेक्षा समाज बाळगतो आहे. भरकटेला समाज परत एकदा बहुजनवादाकडे वळेल व यातून जातीय धर्मांध वर्णवर्चस्ववादी सत्तापिसाळ प्रवृत्तीचा कायमचा नायनाट होईल हे मात्र नक्की.

मुस्लिम समाजाचे नूरखान, सिद्धी हीलाल, रुस्तुमे जमान, दरिया सारंग, काजी हैदर, मीर मोहम्मद, मदारी मेहतर यासारखे असंख्य इस्लाम धमार्ला मानणारे वफादार मुस्लिम सैनिक छत्रपती शिवरायांच्या सैन्यात होते आणि स्वराज्य स्थापन करण्यासाठी त्यांनी कधी आपल्या जीवाची पर्वा केलेली नाही. तसेच कधीही शिवरायांशी आणि स्वराज्याशी गद्दारी केलेली नाही.

नितेश राणे यांनी स्वतः आत्मपरीक्षण करून पाहीले पाहीजे. सत्तेसाठी लाचार होऊन कुठलाही अजेंडा चालवायचा आणि आपल्या आकाला खुश करण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. आजपर्यंत अनेक पक्षांशी गद्दारी करून




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

मंत्रीपदावर बसायचे एवढाच त्यांचा खरा कार्यक्रम. स्वराज्याच्या स्थापनेसाठी ज्या अठरापगड जातील बारा बलुतेदार आणि मुस्लिमसमाजासह तमाम बहुजन समाजातील मावळ्यांनी बलिदान दिलेले आहे, त्यांचा इतिहास आजही उपलब्ध आहे. त्यांनी पहिले निरीक्षण करावे व त्यानंतर स्वतःच आत्मपरीक्षण केले पाहीजे.

आपण कोणकोणत्या पक्षाशी गद्दारी केलेली आहे, अशा गद्दारांनी मुस्लिम समाजावर आणि छत्रपती शिवरायांच्या सत्य इतिहासाची तोडमोड करून सादर करण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये, धार्मिक तेढ निर्माण करू नये. कारण छत्रपती शिवराय हे सर्व धर्म समभाव मानणारे होते. त्यांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी सर्व धर्मीय सर्व जातींना एकत्र करून स्वराज्य स्थापन केलेले होते. अशा महान छत्रपती शिवरायांना कमी दाखवण्याचा प्रयत्न नितेश राणे सारख्या दलबदलू, पक्ष बदलूने करू नये. त्यांनी सत्य संदर्भासह पुराव्यासकट इतिहास दाखवून द्यावा.

अशा प्रकारचे धार्मिक तेढ निर्माण करणारे मंत्री आपल्या मंत्रिमंडळात न ठेवता मुख्यमंत्र्यांनी त्यांची ताबडतोब हकालपट्टी केली पाहीजे. संपूर्ण देशात कायदा आणि सुव्यवस्थेचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य गणले जाते. अशा राज्यात धार्मिक तेढ निर्माण करणारे मंत्री मंत्रिमंडळात कसे ठेवतात? औरंगजेबाचं थडगं उखडून फेकायचंय ना? मग टाईमपास का करताय, कुणी अडवलंय? राज्यात, देशात कुणाची सरकारे आहेत ना? डबल की टीबल इंजिन आहे ना? मग नाटकं का लावलीय? उखडा अन् व्हा मोकळे. अर्थात, इतकी नियत साफ आहे का? असती, तर कृती करून मोकळे झाले असते.

सर्व सरकारे कुणाची आहेत? निर्णय घेण्याचे सर्वाधिकार कुणाला आहेत? राज्यात पाशवी बहुमत आहे. केंद्रात छप्पन्न इंच छातीचा माणूस आहे. मग घोडं अडलंय कुठं? सर्व केंद्रीय संस्था कुणाच्यी ताब्यात आहेत? काही तरतुदी आडव्या येत असतील तर घटनादुरुस्ती करा, वटहुकूम काढा, बुलडोझर फिरवा. संबंधितांना कुणीही अडवलेलं नाही.

मात्र, नियत साफ नसल्याने फक्त पेटवापेटवी करायचीय, धार्मिक द्वेष पसरवायचाय, काही सुपारीबहाद्दरांना हाताशी धरून बाष्कळ बडबडी चालवून धर्मा-धर्मात तेढ निर्माण करायचीय. ऐन रमजान काळात काही वाचाळवीरांना छू करून जनतेची माथी भडकावण्याची कामे सुरू आहेत फक्त.

■ ■ ■

## आधुनिक काळात समाजकार्य हे देखावा बनून राहू नये!

(जागतिक सामाजिक कार्य दिन विशेष १८ मार्च २०२५)

**जगातील महान समाजसुधारकांची नावे आपल्या मनात येताच, त्यांच्याबद्दल आदर आणि श्रद्धेने आपण भरून जातो, कारण त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी संघषार्चे जीवन जगले, अपार वेदना, दुःख सहन केले आणि कठीण परिस्थितीशी झुंज दिली. स्वतःची पर्वा न करता, त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत लोकांच्या हक्कांसाठी, मानवतेसाठी, समानतेसाठी, एकतेसाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी काम केले. त्यांना लोकांच्या समस्या आणि त्यांच्या वेदना जाणवल्या आणि त्या वेदना सुद्धा त्यांनी जगल्या. भेदभाव, जातीयवाद, लिंगभेद, वर्णव्यवस्था, अन्याय, सामाजिक विसंगती आणि कुप्रथा अशा अनेक वाईट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. आज प्रत्येक व्यक्तीला असलेले अधिकार हे त्या समाजसुधारकांच्या कठोर परिश्रमाचे फळ आहेत.**

--------------------

प्राण्यांपेक्षाही वाईट परिस्थितीतून जात मानव आजच्या या स्थितीत पोहोचला आहे. अनादी काळापासून, सती प्रथा, देवदासी प्रथा, अस्पृश्यता, चेटकीण शिकार, बालविवाह, बहुपत्नीत्व, स्त्री जननेंद्रियाच्या विच्छेदनाची प्रथा, स्त्री भ्रूणहत्या यासारख्या भयानक प्रथा भारतात प्रचलित सामाजिक दुष्कृत्ये होती.

मुलींच्या पालकांसाठी हुंडा हा आणखी एक प्रमुख चिंतेचा विषय होता, ज्यामुळे स्त्रीभ्रूणहत्येचे कारणही वाढले. महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते, पितृसत्ताक व्यवस्था प्रबळ होती. खालच्या जाती आणि स्त्रियांना प्राण्यांपेक्षाही वाईट मानले जात असे.

शतकानुशतके चालत आलेल्या अशा दुष्ट प्रथांचे अत्याचार आणि दडपशाही थोर समाजसुधारकांनी थांबवली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी देशात स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कर्मचाऱ्यांना आणि महिलांना हक्क दिले आणि वंचितांना समान दर्जा दिला.

पंडिता रमाबाईंनी बालविवाह थांबवण्यासाठी आणि महिला व विधवांच्या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी काम केले. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, भूदानचे प्रणेते विनोबा भावे, पेरियार ई.व्ही. रामास्वामी, कबीर, रविदास, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, फातिमा शेख, स्वर्णकुमारी देवी, सिस्टर निवेदिता, कादंबिनी गांगुली, धोंडो केशव कर्वे, मदर तेरेसा, बाबा आमटे, सिंधुताई सपकाळ यांच्यापासून ते वर्तमानातील मेधा पाटकर, सुपर ३० चे आनंद कुमार, कैलाश सत्यार्थी, इरोम शर्मिला, सोनम वांगचुक सारखे अनेक त्यांच्या वेगवेगळ्या सामाजिक कायासाठी प्रसिद्ध आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे बाबा यांसारख्या अनेक संतांनीही देशाच्या सामाजिक विकासात अमूल्य योगदान दिले आहे. आजही, देशातील काही अनामिक सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या कार्याद्वारे मानवता आणि समाजाचा विकास करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे.

प्रत्येकजण स्वतःसाठी जगतो, पण जे स्वतः अगोदर दुसऱ्यांचा विचार करतात, लोकांसाठी निस्वार्थपणे जगतात आणि जे स्वतःच्या प्रसिद्धीसाठी कधीही स्वतःचे रणशिंग वाजवत नाहीत त्यांना खरे समाजसेवक म्हणतात.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी जगभरात जागतिक सामाजिक कार्य दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ च्या जागतिक सामाजिक कार्य दिनाची थीम शाश्वत कल्याणासाठी आंतरपिढीय एकता मजबूत करणे₹ आहे. ही थीम पिढ्यानपिढ्या एकमेकांची काळजी घेण्याचे आणि एकमेकांचा आदर करण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

सामाजिक कार्य जीवनात सुसंवाद, समता आणि मानवी विकास कल्याण यावर लक्ष केंद्रित करते. माणुसकीच्या नात्याने समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये परोपकाराची भावना असली पाहिजे. थोर लोक नेहमी म्हणायचे की जर तुम्ही सामाजिक कार्य करताय किंवा निःस्वार्थपणे लोकांना मदत केली तर कोणालाही ते कळू देवू नका, ते अशा प्रकारे करा, जेणेकरून सेवा घेणाऱ्या व्यक्तीला लाज किंवा संकोच वाटू नये आणि आपल्यात देखील अहंकार निर्माण होऊ नये.

चांगली कर्मे करा आणि विसरून जा, प्रत्येक धमार्ने आणि महापुरुषांनी हेच शिकवले आहे, हेच आपले मूल्य असले पाहिजे. जर आपण शरीराने, मनाने, पैशाने किंवा ज्ञानाने सक्षम असू, तर आपण कोणत्याही अपेक्षा न ठेवता आपल्या क्षमतेनुसार असहाय्यांना मदत केली पाहिजे. चांगल्या कामांचे नेहमीच कौतुक केले पाहिजे, जेणेकरून इतरांनाही प्रेरणा मिळेल, परंतु दिखाऊपणा अजिबात नसावा.

माउंटेनमैन दशरथ मांझी, एक अत्यंत सामान्य वृद्ध, गरीब ग्रामीण कामगार, त्यांनी २२ वर्षांच्या अथक संघषार्तून एकट्याने डोंगर तोडून लोकांसाठी मार्ग तयार करून इतिहास रचला. आर्थिक अडचणींशी झुंजत असलेले त्यांचे कुटुंब गरिबीत जगले, परंतु त्यांनी कधीही कोणाकडूनही अपेक्षा केल्या नाहीत.

आजही देशात आणि जगात असे अनेक सामाजिक कार्यकर्ते आहेत जे अगदी सामान्य जीवन जगतात पण त्यांचे कार्य असाधारण आहे. जरी अनेक सामाजिक कार्यकर्ते आधुनिकतेच्या ग्लॅमर आणि प्रसिद्धीपासून दूर असले तरी पण कधीकधी जेव्हा त्यांच्याबद्दल बातमी पाहायला-ऐकायला मिळते तेव्हा आपल्याला खूप अभिमान आणि समाधान वाटतो.

आजच्या काळात, प्रामाणिकपणे कष्ट करून पैसे कमवून असहाय्यांना मदत करणारा माणूस शोधणे खूप कठीण आहे. आपल्या देशात निवडणुकीच्या वेळी राजकारणी कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्च करतात जेणेकरून निवडणूक जिंकल्यानंतर ते गरीब लोकांची निःस्वार्थपणे सेवा करू शकतील.

ते लोकांच्या कल्याणासाठी सर्वस्व त्याग करण्याबद्दल बोलतात, नेत्यांना पक्ष बदलावे लागले तरी ते असे स्पष्टीकरण देतात की, ते फक्त लोककल्याणासाठी असे करत आहेत, त्यांना कसलाही सत्तेचा लोभ नाही आहे.

आजच्या आधुनिक वातावरणाकडे पाहिले तर, प्रत्येक क्षेत्रात, सर्वत्र सामाजिक कार्यकर्त्यांचा पूर आलेला आहे. कोणतीही व्यक्ती, कधीही, आपल्या नावापुढे सामाजिक कार्यकर्ता हा शब्द जोडतो आणि विविध कार्यक्रमादरम्यान, ते रस्त्याच्या चौकात, ट्रॅफिक सिग्नलवर, गल्लोगल्ली सामाजिक कार्यकर्त्याच्या नावाने अनेक बॅनर-बोर्ड लावतात, वर्तमानपत्रांमध्ये त्यांचे संदेश प्रकाशित करतात.

सध्या बॅनर-बोर्डांवर, सोशल मीडियावर अल्पवयीन मुले ही सामाजिक कार्यकर्ते म्हणून स्वतःचे फोटो लावतात. लोककल्याणासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांऐवजी आजकाल फक्त छायाचित्र काढणाऱ्या कार्यकर्तेच जास्त दिसून पडतात.

समाजात मोठ्याप्रमाणात प्रभावशाली आणि श्रीमंत लोकांची संख्या आहे जी धमार्दाय कामांपेक्षा देखाव्याच्या कार्यक्रमांच्या नावाखाली पैसे खर्च करणे पसंत करतात, जेणेकरून त्याचे नाव प्रसिद्ध होईल.

समाजसेवेच्या नावाखाली स्वस्त प्रसिद्धी मिळवण्याची कल्पना लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. गरजूंना थोडेसे अन्न, धान्याचा संच, वस्तू किंवा इतर कोणतीही मदत देऊन ते फोटो काढतात किंवा रील बनवतात आणि नंतर ते सोशल मीडियावर अतिशयोक्तीपूर्णपणे सादर करतात.

जरी बहुतेक स्वयंसेवी संस्था पैसे कमविण्याचे केंद्रे असली तरी, आर्थिक समस्यांशी झुंजत असतानाही काही संस्था खऱ्या अर्थाने सामाजिक सेवेच्या कार्यात गुंतलेल्या आहेत. नवजात अनाथ मुले, असहाय्य वृद्ध, अविवाहित माता, अपंग, मानसिक आजारी लोक, एचआयव्ही बाधित मुले, ड्रग्ज व्यसनी, गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्ण अशा अनेक असहाय्य गरजू लोकांना आधार देऊन, संस्था त्यांना चांगले जीवन जगण्याची संधी देते. समाज ज्यांना स्वीकारण्यास नकार देतो, ज्यांना त्यांचे स्वतःचे कुटुंब मरण्यासाठी सोडून जातात, त्या असहाय्यांना अशा संस्था निस्वार्थपणे जवळ घेतात, यालाच सामाजिक कार्य म्हणतात.

काळानुसार, देशातील सामाजिक समस्या सतत शिगेला पोहोचत आहेत. आजही देशातील अनेक मागासलेले ग्रामीण भाग मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत, प्रत्येक क्षेत्रात गुन्हेगारी वाढत आहे. असंस्कृत गैरवर्तन, फसवणूक, भेसळ, भ्रष्टाचार, अंमली पदार्थांचे व्यसन, घराणेशाही, शिफारस, आर्थिक असमानता, स्वार्थ, लोभ आणि मत्सर सर्वत्र दिसून येतो.

शहरात वृद्धाश्रमांची संख्या सतत वाढत आहे, घरगुती कलह आणि नात्यांमध्ये कटुता वाढत आहे. जर लोकांना समाजसेवेसाठी काम करण्यास बोलावले तर ते पळवाट शोधतात, पण ते प्रसिद्धी आणि फायद्यासाठी पुढे धावतात. सामाजिक कार्यकर्ते किंवा समाजसेवक हे जीवनातील एका मोठ्या त्यागाचे नाव आहे.

जर आपण पर्यावरण, प्राणी, पक्षी, वन्यजीव, लोकांसाठी निस्वार्थपणे मनापासून चांगले काम केले तर आपण आपोआपच एक खरे समाजसेवक बनू. आज, आदर्शवादी सामाजिक कार्यकर्त्यांचा एक मजबूत पाया तयार करण्याची खूप गरज आहे, जेणेकरून येणारी पिढी ते आदर्श स्वीकारून योग्य मार्गदर्शकाची भूमिका चांगल्या प्रकारे बजावू शकेल.

जर सर्व समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते किंवा आपणही, समाजाच्या समस्यांचे गांभीर्य समजून घेत, आपल्या क्षमतेनुसार जागरूकता आणि निःस्वार्थ सेवा करायला सुरुवात केली, तर देशातून प्रत्येक प्रकारची समस्या दूर होऊ शकते.

■ ■ ■

## बंधने फक्त महिलांवरच का?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत.

असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे.

मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात.

कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात.

आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो.

महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का?

पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का?

महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते.

जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये.

महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

■ ■ ■

### अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

**बुरा ना मानो .. !**

'मुझे चेंज चाहिए ' ही
प्रत्येकाची इच्छा
म्हणून
धुलीवंदनाची
आम्ही करतो
भौ प्रतिक्षा ..

सामाजिक बंधने आहेत
म्हणून माणूस
दोरीत वागतो
थोडीशी
डोळेझाक करताच
बघा तो
कसा बहकतो . . !

# सांधेविकार उपचारात क्रांती : भारतातील ऑर्थोपेडिक उपचारांचा उत्कृष्टतेकडे प्रवास

**नागपूर १७ मार्च :** ऑर्थोपेडिक्स अर्थात अस्थिरोग उपचारांच्या क्षेत्रात सांध्यांची काळजी घेणे विशेषतः भारतातील नागरिकांसाठी काळाची गरज बनली आहे. भारतात सांध्यांचे आजार झपाट्याने वाढत आहेत. सुमारे १५ टक्के भारतीय नागरिक ऑस्टिओ आर्थरायटिसने (सांधेधुखीचा विकार ज्यात हळूहळू सांध्यांचा त्रास होतो) त्रस्त आहे. जीवनशैलीतील बदल तसेच वाढत्या वयाबरोबर हे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे.

नागपूर, महाराष्ट्र येथील वोक्हार्ट हॉस्पिटलचे रोबोटिक सांधे प्रत्यारोपण व आर्थ्रोस्कोपी शल्यचिकित्सक डॉ. मुकुंद अग्रवाल यांनी ऑर्थोपेडिक्स क्षेत्रात आठ वर्षांहून अधिक काळ रुग्णांची सेवा केली असून, मिनिमली इन्व्हेसिव्ह तंत्रज्ञानाद्वारे जॉईंट आणि हिप रिप्लेसमेंट, वयस्कर रुग्णांमध्ये जॉईंट रिकन्सस्ट्रक्शन , आर्थ्रोस्कोपी, गुंतागुंतीच्या फ्रॅक्चरचे व्यवस्थापन, ऑर्थोबायोलॉजिक्स आणि रीजनरेटिव्ह मेडिसिन यामध्ये विशेष कौशल्य मिळवले आहे. त्यांनी कस्तुरबा मेडिकल कॉलेज, मणिपाल आणि एनएचएस हॉस्पिटल (इंग्लंड) तसेच मेडस्टार वॉशिंग्टन हॉस्पिटल (अमेरिका) येथे उच्च प्रशिक्षण घेतले आहे.

मिनिमली इन्व्हेसिव्ह (सब-व्हॅस्टस) तंत्रज्ञानाद्वारे गुडघ्याची शस्त्रक्रिया आणि हिप रिप्लेसमेंटसाठी डायरेक्ट अँटेरियर अप्रोच (डीएए) यासारख्या विशेष तंत्रज्ञानामुळे अनेक भारतीय रुग्णांमध्ये आढळून येणाऱ्या शारीरिक आव्हानांना तोंड देता येते. या तंत्रांमुळे स्नायूंवर कमी ताण येतो, रक्तस्राव कमी होतो, वेदना



कमी होतात आणि रुग्ण कमी वेळात पूर्वीप्रमाणे बरा होतो.

भारतीय ऑर्थोपेडिक क्षेत्रात एवढी प्रगती होऊन देखील आजही अनेक भारतीय लोक नकळतपणे सांधेविकारांच्या प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष करतात. गुडघ्यात सतत जडपणा जाणवणे, जिने चढताना त्रास होणे, सांधे सूजणे किंवा दैनंदिन कामकाज करताना सांध्यांना वेदना होणे यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने नंतर गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया कराव्या लागू शकतात. योग्य वेळी निदान व उपचार घेतल्यास या समस्या टाळता येऊ शकतात.

याशिवाय, ऑर्थोबायोलॉजिक्स आणि रिजेनरेटिव्ह मेडिसिन यांसारख्या अद्ययावत उपचार पद्धतींमुळे मोठ्या शस्त्रक्रियेला पर्यायी प्रभावी उपचार उपलब्ध होत आहेत. हे तंत्रज्ञान सांधे संरक्षण आणि आधुनिक फिजिओथेरपीच्या माध्यमातून रुग्णांना पूर्ववत बरे करते. या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळे लाखो लोकांना निरोगी आयुष्य जगण्यास मदत होत आहे आणि प्रभावी अस्थिव्यंग उपचार अधिक सुलभ आणि फायदेशीर ठरत आहेत.

नागपूर, महाराष्ट्र येथील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये आम्ही प्रत्येक रुग्णाच्या वैयक्तिक गरजेनुसार उपचार देण्यास वचनबद्ध आहोत. आमचे तज्ज्ञ अस्थिरोगतज्ज्ञ(ऑर्थोपेडिक डॉक्टर) आणि विशेष प्रशिक्षित परिचारिका एकत्रितपणे कार्य करून प्रत्येक रुग्णासाठी सर्वोत्तम उपचार सुनिश्चित करतात. यासोबतच आमची कुशल फिजिओथेरपी टीम रुग्णाच्या प्रभावी पुनर्वसनासाठी व्यापक योजना तयार करण्यास कटिबद्ध आहे. आम्ही केवळ उपचारावरच भर न देता, दीर्घकालीन निरोगी आरोग्य आणि संपूर्ण आरोग्यविषयक स्वास्थ्य यावर लक्ष केंद्रित करतो.

लाइफ विन्स या आमच्या ब्रीदवाक्यानुसार, आम्ही आमच्या रुग्णांना सर्वोत्तम आरोग्य प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

# रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आहारामध्ये समाविष्ट केले पाहिजेत हे खाद्यपदार्थ

**नागपूर १७ मार्च :** हवामानामध्ये बदल होत असताना रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासोबत आरोग्य उत्तम राखण्यासाठी आरोग्यदायी व संतुलित आहाराचे सेवन करणे आवश्यक आहे. दैनंदिन आहारामध्ये बदाम, हंगामी फळे आणि भाज्या यांसारख्या पौष्टिक खाद्यपदार्थांचा समावेश केल्यास आवश्यक पौष्टिक घटक मिळतात, जे संसर्गांविरोधात लढण्यास मदत करतात. खाली चार शक्तिशाली रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे खाद्यपदार्थ दिले आहेत, जे तुमचे हंगामी फ्लू व आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करू शकतात.

बदाम: बदाम स्वादिष्ट असण्यासोबत त्यांच्यामध्ये १५ आवश्यक पौष्टिक घटकांसह व्हिटॅमिन ई, झिंक, फोलेट व लोह असे सर्वोत्तम पौष्टिक घटक असतात, जे रोगप्रतिकारशक्तीसाठी महत्त्वाचे असतात. उत्तम पोषणासाठी दररोज मूठभर बदामांचे सेवन करा किंवा रोजच्या ब्रेकफास्टमध्ये बदामांचा समावेश करा. नैसर्गिकरित्या क्रंची, स्वादिष्ट व पौष्टिक असलेले बदाम कधीही आस्वाद घेता येऊ शकणारा स्नॅक आहे. खरेतर, फूड सेफ्टी अँड स्टॅण्डर्डस् ऑथोरिटी ऑफ इंडिया (एफएसएसएआय) सांगते की, नियमित बदामांचे सेवन केल्याने रोगप्रतिकारशक्ती उत्तम राहते. दैनंदिन आहारामध्ये बदामांचा समावेश करणे स्वस्थ राहण्यासाठी सोपा, पण गुणकारी मार्ग आहे.

लिंबूवर्गीय फळे: संत्री, लिंबू, मोसंबी व द्राक्षे यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते. व्हिटॅमिन सी हा पौष्टिक घटक शरीराचे संसर्गांपासून संरक्षण करणाऱ्या रक्तातील पांढऱ्या पेशींच्या निर्मितीसाठी आवश्यक असतो. आहारामध्ये या फळांचा समावेश केल्याने व्हिटॅमिन सी मिळू शकते, परिणामत: रोगप्रतिकारशक्ती प्रबळ होते.

लसूण: लसणाच्या औषधी उपयोगाचा दीर्घकालीन इतिहास आहे. लसणामध्ये अँटी-बॅक्टेरिअल गुण असण्यासोबत नैसर्गिक संयुग ॲलिसिन असते. आहारामध्ये लसणाचा समावेश केल्याने स्वादाची भर होते, तसेच सूक्ष्म जीवाणूंविरोधात लढण्यास मदत देखील होते. स्वाद व उत्तम आरोग्यासाठी रस्सा, सूप, स्टिर-फ्राइज व सॉसेसमध्ये किसलेला लसूण टाका.

हिरव्या पालेभाज्या: मेथी, शेवग्याची पाने, राजगिरा पाने, पुदीना यांसारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये व्हिटॅमिन्स व ॲण्टीऑक्सिडण्ट्स असतात, जे रोगप्रतिकारशक्ती उत्तम राखण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या हिरव्या पालेभाज्यांमध्ये व्हिटॅमिन्स ए व सी आणि फोलेट असे पौष्टिक घटक असतात, जे रोगप्रतिकारशक्ती आरोग्यदायी राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. करी, रस्सा, डाळ, सलाड्स अशा स्वरूपात हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश करा आणि आहार पौष्टिक व स्वादिष्ट बनवा.

# विषकन्या खतरनाक, रहस्यमय आणि विखारी वृत्तीची : पवित्रा पुनिया



**मुंबई, १७मार्च :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत दरबारी कवी आणि मुत्सद्दी तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज) च्या सुरस आणि बुद्धीचातुर्याच्या कथांनी प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. सध्या सुरू असलेल्या नवीन अध्यायात काली मा (बरखा बिष्ट) ने विजयनगरावर मोठे संकट येणार असल्याचे भाकीत वर्तवले आहे, त्यामुळे आपल्या साम्राज्याच्या रक्षणार्थ तेनाली रामा विजयनगरात परतला आहे.

विषकन्या लैलाने (पवित्रा पुनिया) एका मोहक नर्तकीच्या रूपात विजयनगरात नाट्यमय प्रवेश केला आहे, ज्याच्यामागे तिचा अंत:स्थ हेतू आहे- सूड! तिच्या वरकरणी मोहक दिसणाऱ्या रुपाच्या मागे एक कुटिल हेतू आहे आणि आपल्यावर पूर्वी झालेल्या अन्यायाचा सूड घेण्यासाठीच ती आली आहे. राजा कृष्णदेवराय (आदित्य रेडिज) हे तिचे मुख्य लक्ष्य आहे. पण, तिम्मारासु (अमित पचोरी) ला तिचा डाव समजतो, तेव्हा तिच्या योजनेत एक अनपेक्षित वळण येते. त्याला गप्प करण्यासाठी ती एक घातक हल्ला करते. ज्यात तिम्मारासु गंभीररित्या जखमी होतो. या कथेतील मुख्य खलनायिका विषकन्या राज्यात प्रवेशल्यानंतर एकामागून एक भयंकर आणि वेधक घटनाक्रम सुरू होतो. विजयनगरमध्ये भय, कुतूहल आणि बेगडीपणा व सत्य यांच्यातील संघर्षाचे वातावरण निर्माण होते.

पवित्रा पुनियाशी चर्चा केली असता तिने विषकन्या लैला ही भूमिका बजावण्याचा आपला अनुभव, तेनाली रामा मालिकेचे यश आणि इतर विषयांबाबत दिलखुलास गप्पा मारल्या.

तू अलीकडेच विषकन्या या व्यक्तिरेखेच्या रूपात तेनाली रामा मालिकेत प्रवेश केला आहेस. या व्यक्तिरेखेतील कोणती गोष्ट तुला सगळ्यात जास्त वेधक वाटली?

विषकन्या या व्यक्तिरेखेचा स्वभाव आणि फँटसी हा प्रकार मला फारच आकर्षक वाटला. टेलिव्हिजनवर अभिनय करत असताना फँटसी आणि कॉस्च्युम ड्रामा यांचे मला पहिल्यापासून आकर्षण वाटत आले आहे. या भूमिकांमध्ये नानाविध छटा असतात- ॲक्शन, तीव्रता आणि गूढपणा- जे मला फारच आवडते. त्यामुळे या भूमिकेला मी नकार देण्याचा प्रश्नच नव्हता.

तुझी व्यक्तिरेखा अगदीच वेगळी आणि खतरनाक आहे. या भूमिकेसाठी तू काय तयारी केलीस?

खरं सांगायचं तर अशा भूमिकेसाठी मला फारशी तयारी करावी लागत नाही. कारण मला त्या स्वाभाविकपणे जमतात. मला वाटते, या भूमिका म्हणजे माझा USP आहे, आणि मला त्याचा अभिमान वाटतो. निर्माते मला अशा भूमिकांसाठी योग्य मानतात हा मला माझा गौरव वाटतो. कारण मी नेहमीच माझे १००% योगदान देते आणि भूमिकेला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करते. विषकन्या खतरनाक, रहस्यमय आणि विखारी वृत्तीची आहे, ज्यामुळे ही भूमिका माझ्यासाठी आणखीनच रोमांचक झाली आहे.

विषकन्या एक गूढ आणि दमदार व्यक्तिरेखा आहे. तिच्या आगमनामुळे तेनाली रामाच्या कथानकावर कसा प्रभाव पडेल?

माझी व्यक्तिरेखा मालिकेत नुकतीच दाखल झाली आहे. तरीही प्रेक्षकांना ती आवडते आहे, हे मला जाणवते आहे. जेव्हा जेव्हा मालिकेत एखादी नवी व्यक्तिरेखा दाखल होते, तेव्हा ती आपल्यासोबत नवीन ऊर्जा, कुतूहल आणि आकर्षण घेऊन येते. विषकन्या या व्यक्तीतेखेच्या उपस्थितीमुळे कथानकात एक रहस्य आणि धोका उत्पन्न झाला आहे. कारण ती विषारी आहे- शब्दशः आणि रूपकात्मक अशा दोन्ही स्तरांवर! मला आशा वाटते की माझी व्यक्तिरेखा तेनाली रामाच्या यशात योगदान देईल आणि पुढची अनेक वर्षे प्रेक्षकांना खिळवून ठेवू शकेल.

या मालिकेतला तुझा लुक खास आहे. विषकन्या अवतार धारण करण्याचा अनुभव कसा आहे?

मी पहिल्यांदाच नकारात्मक भूमिका करताना श्वेत वस्त्र परिधान करत आहे. सामान्यपणे अशा व्यक्तिरेखांचा पोशाख गडद रंगाचा असतो. पण या लुकमुळे ती एखाद्या अप्सरेसारखी दिसते, जे मला फार आवडले आहे. आणि सगळ्यात जमेची बाब ही आहे की, तयार होण्यासाठी फारसा वेळ लागत नाही. बस, थोडासा बदल केला की मी तयार!

तू आजवर दमदार, अपारंपरिक भूमिका केल्या आहेस. त्या सगळ्या भूमिकांपेक्षा विषकन्या ही भूमिका कशी वेगळी आहे?

एका अर्थी विषकन्या ही भूमिका देखील मी यापूर्वी साकारलेल्या फँटसी व्यक्तिरेखांसारखीच आहे. पण हा लुक आणि स्टाइलिंग एकदम नवीन प्रकारचे आहे. फँटसी भूमिकांमध्ये बऱ्याचदा विशिष्ट प्रकारचे हावभाव आणि लकबी अपेक्षित असतात, त्यामुळे त्या दृष्टीने पाहिल्यास या भूमिकेकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन तसाच आहे. पण, मोठ्या कालावधीनंतर मी अशी व्यक्तिरेखा साकारत आहे, त्यामुळे मला छान वाटते आहे.

शेवटी, तेनाली रामा बघणाऱ्या आपल्या चाहत्यांना तू काय संदेश देशील?

मी इतकेच सांगेन की, माझ्या चाहत्यांनी मला नेहमी जे प्रेम दिले आहे त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. मी खलनायिका करत असूनही मला लोकांचे प्रेम आणि कौतुक मिळाले आहे, त्याने मी भारावून जाते. मला आशा आहे की, तेनाली रामामध्ये विषकन्याच्या रूपात देखील ते मला स्वीकारतील आणि मालिकेतील हा नवीन अध्याय त्यांना नक्की आवडेल.

# टाटा ब्लूस्कोप स्टीलच्या विस्तार योजनेमुळे विदर्भात वाढले डीलरसचे जाळे

**नागपूर १७ मार्च :** टाटा ब्लूस्कोप स्टीलने विदर्भातील नवीन डीलर्स नियुक्त करण्याच्या उद्देशाने आपल्या विस्तार योजनेअंतर्गत एक वॉक-इन नोंदणी मोहीम यशस्वीपणे राबविली. ८ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे टाटा ब्लूस्कोप स्टीलप्रति असलेला लोकांचा विश्वास या भागात वाढला. या नोंदणी मोहिमेमध्ये मोठ्या संख्येने अनेकांनी सहभाग नोंदवला, जिथे सहभागी झालेल्या व्यक्तींनी DURASHINE® डीलरशिप प्रोग्राम, त्याचे फायदे आणि टाटा ब्लूस्कोप स्टीलच्या उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांविषयी महत्वपूर्ण माहिती मिळवली.

या कार्यक्रमाला विदर्भातील १० प्रमुख जिल्ह्यांतील इच्छुक उद्योगजकांची उपस्थित होती नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, वाशीम आणि चंद्रपूर. हा वाढता प्रतिसाद टाटा ब्लूस्कोप स्टीलच्या डीलरशिप संधींबद्दल वाढती जागरूकता आणि ब्रँडचा झालेला विस्तार दर्शवतो.

या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे महिला उद्योजकांचा सहभाग, ज्यामध्ये महिला बचत गट यासारख्या महिला स्वयं-सहायता गटांच्या प्रतिनिधींचाही समावेश होता. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, टाटा ब्लूस्कोप स्टीलने या महिलांचा सत्कार केला आणि त्यांचा उद्योजकतेतील उत्साह तसेच स्थानिक समुदायांना सक्षम करण्यामध्ये त्यांच्या भूमिकेचा गौरव केला.

विस्तार पुढाकार योजनेला मिळालेला प्रचंड प्रतिसाद विदर्भातील व्यावसायिकतेला गती प्रदान करण्यासाठी आणि आमच्या डिलर्स चे जाळे वाढवण्यासाठी असलेल्या आमच्या वचनबद्धतेचा दाखला आहे. इच्छुक उद्योजकांशी, विशेषतः महिलांच्या नेतृत्वात उभारलेल्या व्यवसायांशी जोडून, आम्ही आमच्या उच्च-गुणवत्तेच्या स्टील उत्पादनांसाठी अधिक समावेशक आणि मजबूत वितरणाचे जाळे/नेटवर्क तयार करण्याचा प्रयत्न करतो, असे टाटा ब्लूस्कोप स्टीलच्या प्रिया राजेश, डीजीएम - मार्केटिंग आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन यांनी सांगितले.

डीलर्सच्या सबलीकरणावर आणि प्रादेशिक विस्तारावर भर देत, #ShelterForAll या उद्देशासह, टाटा ब्लूस्कोप स्टील विदर्भातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आहे. टाटा ब्लूस्कोप स्टील उत्कृष्ट दर्जाच्या रूफिंग आणि वॉलिंग सोल्यूशन्स पुरवण्यास कटिबद्ध असून गुणवत्ता, टिकाऊपणा आणि कार्यक्षमतेसाठी नवीन प्रमाण देत आहे.

ग्राहकांपर्यंत उत्तम स्टील सोल्यूशन्स पोहोचवण्यासाठी आणि टाटा ब्लूस्कोप स्टीलच्या भागीदारांसाठी शाश्वत वाढ निर्माण करण्यासाठी कंपनी येत्या महिन्यांत संपूर्ण देशभरात विस्तार उपक्रम राबविणार आहे.

# शॉपर्सस्टॉपचे नागपुरात पहिले स्टोअर सुरु!

**नागपूर १७मार्च :** भारतातील आघाडीचे प्रीमियम फॅशन, सौंदर्य आणि भेटवस्तू देणारे ठिकाण असलेल्या शॉपर्स स्टॉपने नागपुरात सिव्हिल लाईन्स येथे असलेल्या त्यांच्या पहिल्या स्टोअरच्या लॉन्चची अभिमानाने घोषणा केली. या स्टोअरचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या पत्नी कांचन गडकरी यांनी केले. हे नवीन स्टोअर ब्रँडच्या विस्तार धोरणातील एक महत्त्वाचे पाऊल आहे, जे भारताच्या मध्यभागी जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव देते.



नागपूरमधील खरेदीदार आता ५०० हून अधिक प्रीमियम ब्रँड, नवीनतम फॅशन ट्रेंड, एक उत्कृष्ट सौंदर्य अनुभव आणि घड्याळे, बॅग्ज आणि भेटवस्तूंच्या विस्तृत श्रेणी बघू शकता, ते पण सर्व एकाच छताखाली. लोकप्रिय शॉपर्स स्टॉप, फर्स्ट सिटीझन्स क्लब लॉयल्टी प्रोग्राम शॉपिंग रिवॉर्ड्समध्ये आणखी वाढ करेल, तर ब्युटी मेकओव्हर आणि वैयक्तिक खरेदीदारांसारख्या प्रीमियम सेवा ऑरेंज सिटी रहिवाशांसाठी शॉपिंग अनुभव आणखी वाढवतील.

नागपूरमधील कंपनीच्या नवीन स्टोअरबद्दल बोलताना, शॉपर्स स्टॉप लिमिटेडचे कस्टमर केअर असोसिएट, व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ कविंद्र मिश्रा म्हणाले, महाराष्ट्र नेहमीच आमच्यासाठी एक प्रमुख बाजारपेठ राहिले आहे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि वाढत्या अर्थव्यवस्थेसह, नागपूर आमच्या विस्तारासाठी एक नैसर्गिक निवड आहे. आम्ही देशभरात आमची उपस्थिती मजबूत करत असताना, शॉपर्स स्टॉपला भारताच्या मध्यभागी आणण्यास आम्हाला आनंद होत आहे. नागपूरमधील आमचे नवीन स्टोअर फॅशन, सौंदर्य आणि जीवनशैली उत्पादनांचा विचारपूर्वक निवडलेला संग्रह देण्यासाठी डिझाइन केलेले आहे, जे अपवादात्मक ग्राहक सेवा आणि विशेष अनुभवांनी पूरक आहे. आमच्या ग्राहकांना चांगले दिसण्यासाठी आणि आत्मविश्वासाने वाटण्यासाठी प्रेरणा देणारा जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव प्रदान करताना आम्ही प्रीमियम फॅशन आणि सौंदर्य अधिक सुलभ बनवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

या लॉन्चसह, शॉपर्स स्टॉपने भारताच्या गतिमान रिटेल व्यवसायासह विकसित होण्याची आपली वचनबद्धता सुरू ठेवली आहे. नागपूर स्टोअरमध्ये कॅल्विन क्लेन, अरमानी एक्सचेंज, सेरुती, टॉमी हिलफिगर, गेस, अल्डो आणि इतर अनेक उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय आणि भारतीय ब्रँडचा विस्तृत संग्रह प्रदर्शित केला जाईल - त्यापैकी काही केवळ शॉपर्स स्टॉपद्वारे या प्रदेशात उपलब्ध असतील.

नागपूरमधील नवीन शॉपर्स स्टॉप स्टोअरमध्ये लोकप्रिय आणि प्रतिष्ठित ब्रँडची विस्तृत श्रेणी असेल, जी बाजारात फक्त शॉपर्स स्टॉपद्वारे उपलब्ध असेल. ग्राहक कॅल्विन क्लेन, अरमानी एक्सचेंज, सेरुती, पाको रबाने, जस्ट कॅव्हॅली, मोकोबारा, बेव्हरली हिल्स, पोल्प क्लब गेस, मॅक, अल्डो आणि इतर अनेक आघाडीच्या ब्रँड्सची प्रभावी श्रेणी एक्सप्लोर करू शकतात. नागपुरातील फॅशन प्रेमींना शॉपर्स स्टॉपवर आमंत्रित केले आहे, जेणेकरून ते त्यांच्या खरेदीचा अनुभव वाढविण्यासाठी डिझाइन केलेले स्टाइल, सुसंस्कृतपणा आणि उत्कृष्ट ग्राहक सेवेचे उत्तम मिश्रण याचा आनंद घेऊ शकतील.

# मुंबईतील उद्योजक जोडप्याने द बेअर हाऊससोबत पुरुषांच्या कपड्यांमध्ये क्रांती कशी घडवली

**बेंगळुरू, १७मार्च :** १३ मार्च रोजी सोनी लिव वर प्रसारित झालेल्या बिझनेस रिॲलिटी टीव्ही मालिकेतील शार्क टँक इंडियाच्या नवीनतम भागात, स्मार्ट कॅज्युअलमध्ये विशेषज्ञता असलेल्या समकालीन पुरुषांच्या पोशाख आणि ॲक्सेसरीज ब्रँड द बेअर हाऊसच्या सह-संस्थापकांनी - तन्वी आणि हर्ष सोमय्या - यांनी शार्क नमिता थापरकडून ३ कोटींची गुंतवणूक मिळवली आहे.





व्यवसाय वाढवण्यात तज्ज्ञ असलेल्या एमक्युअर फार्मास्युटिकल्सच्या कार्यकारी संचालक नमिता यांच्या गुंतवणूक करारात १% इक्विटी स्टेकसाठी १ कोटी आणि कर्ज म्हणून २ कोटींचा समावेश आहे. या भागात, ज्यामध्ये शार्क नमिता थापर, अनुपम मित्तल, अमन गुप्ता, विराज बहल आणि कुणाल बहल होते, या जोडप्याने द बेअर हाऊसची नफाक्षमता, स्केलेबिलिटी आणि उत्पादन ऑफरिंग्जने परीक्षकांना प्रभावित केले. शार्क अमनने ब्रँडचे वर्णन 'खरे असण्यास खूपच चांगला' असे केले.

शार्क कुणाल बहलनेही रस दाखवला आणि १०० कोटी मूल्यांकनावर ३% इक्विटी स्टेकसाठी ३ कोटी गुंतवण्याची ऑफर दिली. हर्ष आणि तन्वी सोमय्या यांना वाटले की नमिता थापरची ऑफर त्यांच्या दृष्टिकोनाशी चांगली जुळते आणि त्यांनी दोन्ही शार्कमधून निवड करताना तिच्यासोबत पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

युरोपियन फॅशनपासून प्रेरित आणि हायब्रिड वर्क कल्चरसाठी डिझाइन केलेल्या उच्च-गुणवत्तेच्या, मिनिमलिस्टिक आणि स्मार्ट कॅज्युअलसाठी ओळखल्या जाणाऱ्या या पुरुषांच्या कपड्यांच्या ब्रँडला गुंतवणूकदारांकडून खूप प्रशंसा मिळाली.

शार्क टँकवर असणे आणि परीक्षकांचा विश्वास आणि पाठिंबा मिळवणे हा द बेअर हाऊस टीमसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे! या गुंतवणुकीद्वारे त्यांना आमच्या कपड्यांचा अनुभव घेता आला आणि आमच्या व्यवसाय मॉडेलवर विश्वास ठेवता आला की आमचे स्वप्न सत्यात उतरते - भारतीय पुरुषांना आमच्या कपड्यांद्वारे त्यांचे अद्वितीय व्यक्तिमत्व व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळते, ते कुठेही जातात किंवा काहीही करतात तरीही. या अनुभवामुळे पुरूषांच्या कपड्यांच्या क्षेत्रात एक पॉवरहाऊस म्हणून आमची प्रतिष्ठा मजबूत झाली आहे, द बेअर हाऊसचे सह-संस्थापक तन्वी सोमय्या म्हणाले.

आमचे तत्वज्ञान नेहमीच सोपे राहिले आहे - आमचे उत्पादन आमचे ब्रँड ॲम्बेसेडर आहे! द बेअर हाऊसचे सह-संस्थापक हर्ष सोमय्या म्हणाले.

कॅज्युअल शर्ट श्रेणीमध्ये ते अव्वल स्थानावर असलेल्या मिंट्रावरील त्याच्या मजबूत उपस्थितीव्यतिरिक्त - हा ब्रँड फ्लिपकार्ट, अजियो, टाटा क्लिक, नायका आणि अमेझॉनवर देखील उपलब्ध आहे. झेप्टो सारख्या हायपरलोकल क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्मसह सहकार्याद्वारे ते आपली पोहोच आणखी वाढवत आहे.

तुमची कहाणी खरी असण्यास खूपच चांगली वाटते - पण ती फक्त एक कथा नाही, ती तुमची वास्तविकता आहे. अडचणींना तोंड देऊनही, तुम्ही अधिक मजबूत झाला आहात, तुमच्या चेहऱ्यावर हास्य आणि सचोटी अबाधित आहे. ती लवचिकता आणि वचनबद्धता मला तुमच्यावर विश्वास ठेवायला लावते, असे नमिता थापर यांनी ऑफर देताना सांगितले.

तिने ब्रँडचे १०० कोटी मूल्यांकन कायम ठेवले, १% इक्विटी स्टेकसाठी १ कोटी आणि १०% व्याजदराने २ कोटी कर्ज देऊ केले, जे पाच वर्षांत परतफेड करता येईल.

# कार्यालय नगर परिषद वरोरा जि. चंद्रपूर


क्र.वशी/स्वच्छता/ ५५ /२०२५ दि १३/३/२०२५

## ई-निविदा सुचना

वरोरा नगरपरिषद, स्वच्छता विभाग करीता नाले सफाई चे कामे करणे या कामी ई-निविदा प्रणालिद्वारे (ऑनलाइन) बी-१ फॉर्म नमुन्यातील ऑनलाइन निविदा योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदारकडून / पुरवठा दाराकडून मागवीत आहे. या निविदेच्या पूर्व अहर्ता अटी व सविस्तर निविदा सूचना शासनाच्या http//mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १८/०३/२०२५ पासून पाहता येईल व डाउनलोड तसेच भरता येईल. सदर निविदा दिनांक २५/०३/२०२५ दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करता येतील.

मुख्याधिकारी
नगरपरिषद वरोरा

# शब्दकोडे क्रमांक २०६०



**आडवे शब्द :-**
१) आपले राष्ट्रीय गीत
५) स्त्री
६) अग्रलेख
१०) रक्तवाहिनी
११) तृण
१३) नवरदेव
१४) मादीच्या विरुद्ध
१६) निरुपयोगी
१८) मदन
२१) द्रव्य, धन
२२) विजार
२५) कडक व चिवट
२६) सारखा
२७) कमीशन, बट्टा
२८) प्राचीन
३०) पूर्ण बदल
३२) गाव
३४) गाढव
३५) एक चर्मवाद्य
३७) उपवासाला चालेणारा एक कंद
३८) मोठी वाटी
४०) शंकर
४१) च्या साठी
४३) वस्तरा
४५) खेकडा
४७) मवाळ धोरण
५०) जंगलाला लागलेली आग
५२) गंध
५४) राजा
५५) डाका
५७) थान
५९) खराब
६१) ममता, आपलेपणा
६३) नाश, प्रलय
६५) डोंगरातून आरपार गेलेला रस्ता
६७) एकूणएक, सर्व
६८) लाज
७०) ज्यास जहागीर मिळाली आहे असा
७५) साधारण
७६) पातळसर
७९) पाठविलेला
८१) साळी
८२) गज, वारण
८३) होडी
८४) न घाबरणारा

**उभे शब्द :-**
१) नमस्कार
२) रोग पसरविणारा किटक
३) निष्णात
४) सुसर
५) वार्ता
७) शुद्ध, पवित्र
८) प्रत्येक, भाव
९) उचित, योग्य
१२) खूण इशारा
१५) धपाटा
१७) मतलबापुरते नाते
१९) नूतन
२०) ताबडतोब
२१) कैफ, उन्माद
२३) मुसलमान
२४) धोका
२६) समतल
२७) लग्नासाठी जमलेली नात्यातील मंडळी
२९) माणूसघाणा, मत्सरी
३१) धडक
३३) मगज
३६) नष्ट, खाऊन संपविणे
३९) हवेतील थंडावा
४०) मिठाई तयार करणारा
४२) सिंह
४४) वाळवंट
४६) रातंबीचे साल
४८) पराग
४९) मुस्लीमांचा एक सण
५१) चौकशी
५३) सटवाई, दुष्ट स्त्री
५६) प्रत्येक दिवशी
५८) ** दमयंती
६०) उदबत्ती
६१) आंब्यातील द्रवपदार्थ
६२) माकड
६४) नवरा
६५) रेल्वेचा डबा
६६) मोठा भाऊ
६९) एकत्रित रडणे
७१) पराजय, माळ
७२) जिव्हा
७३) समईतील कापसाची गुंडाळी
७४) दुर्दशा
७५) अमृत
७७) आवाज, नाद, ध्वनी
७८) अस्वल
८०) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



युवा मानस

# कोणते स्मार्टफोन बाजारात येणार?

नवीन काय?

'ॲपल'च्या आयफोन १६ई सह इतर अनेक स्मार्टफोन फेब्रुवारीमध्ये लॉन्च झाले. आता स्मार्टफोन प्रेमींसाठी मार्च महिनाही असाच खास असणार आहे. कारण 'सॅमसंग'सह इतर अनेक कंपन्या या महिन्यात आपापली नवीन मॉडेल लॉन्च करणार आहेत. तेव्हा नवीन स्मार्टफोन घ्यायचा असेल तर या महिन्यातील अनेक नवीन पर्यायांची माहिती घ्या.

* 'नथिंग फोन ३ ए' या सीरिजमध्ये नथिंग फोन ३ए आणि नथिंग फोन ३ए प्रो ही मॉडेल्स चर्चेत आहेत. २ ए आणि २ ए प्लस च्या तुलनेत या दोन्ही मॉडेल्सना नवीन लुक आणि अपग्रेड फीचर्स दिले जातील, असे यासंबंधीच्या टीझरमधून समोर आले आहेत. ३ ए प्रो मध्ये ५० एमपी पेरिस्कोप कॅमेरा असण्याची अपेक्षा आहे.



* आयकूही मिड-रेंज सेगमेंटमध्ये एक नवीन स्मार्टफोन लॉन्च करणार असून 'आयकू निओ १०आर ५जी' ॲमेझॉनद्वारे विकला जाईल. त्याची किंमत ३० हजार रुपयांपेक्षा कमी असू शकते. यात ६.७८ इंचाचा डिस्प्ले आणि ८ एस जेन ३ प्रोसेसर असण्याची अपेक्षा आहे. त्याच्या मागील बाजूस एक ५० एमपी मुख्य सेन्सर प्रदान केला जाऊ शकतो.

* विवा टी४ एक्स ५ जी विवा टी४ एक्स ५ जी स्मार्टफोन देखील या महिन्यात लॉन्च होऊ शकतो. कंपनीने त्याची टीझर लाँच केला आहे. हा फोन ६.७२ इंचाचा एफएचडी, आयपीएस एलईडी डिस्प्ले, मीडिया टेक डायमेंशन ७३००, ५०एमपी मुख्य सेन्सरसह ड्युअल कॅमेरा सेट आणि जलद चार्जिंग सपोर्टसह ६,५०० एमएएच बॅटरीसह असेल. त्याच्या लॉन्चची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही.

* सॅमसंग मार्चमध्ये तीन नवीन फोन लॉन्च करण्याच्या तयारीत आहे. गॅलेक्सी ए सीरीज स्मार्टफोन भारतात लॉन्च केले जातील. हा फोन मेटल फ्रेमसह येऊ शकत असल्याचे टीझरमधून समोर आले आहे. असे मानले जात आहे की कंपनी गॅलेक्सी ए २६ स्मार्टफोन गॅलेक्सी ए ३६ आणि गॅलेक्सी ए ५६ सोबत लॉन्च करू शकते.

* 'पोको' ने अधिकृतपणे एम ७ ५ जी भारतात लॉन्च करण्यास दुजोरा दिला आहे. कंपनीने दावा केला आहे की १०,००० रुपयांपेक्षा कमी किमतीचा हा पहिला स्मार्टफोन असेल, जो १२ जीबी रॅम (६ जीबी फिजिकल रॅम + ६ व्हर्च्युअल रॅम) आणि स्नॅपड्रॅगन ४ जेन २ प्रोसेसरसह येईल.





# ऐंशी टक्के लोकांना हवाय नोकरीत बदल

करिअर

दिवसेंदिवस भारताच्या लोकसंख्येत वाढ होत आहे; मात्र या वाढणाऱ्या लोकसंख्येबरोबरच रोजगाराच्या समस्यादेखील निर्माण होत आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांचे संकट आहे. एका अहवालानुसार, भारतात दर दहापैकी आठ लोक नवीन नोकरीच्या शोधात आहेत. अर्ध्याहून अधिक म्हणजे जवळपास ५५ टक्के लोक म्हणतात, की नवीन वर्षात नोकरी शोधणे अधिक कठीण झाले आहे. 'लिंक्डेन'ने केलेल्या अभ्यासात ही माहिती समोर आली आहे.

**भारतातील ६९ टक्के 'एचआर'**

व्यावसायिकांचा वाटते, की आता कुशल कर्मचारी शोधणे पूर्वीपेक्षा अधिक कठीण झाले आहे. याचा अर्थ २०२५ मध्ये नोकऱ्या शोधण्याच्या पद्धतीत बदल करण्याची गरज आहे. गेल्यावर्षीही नोकरी शोधणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. मात्र आताही परिस्थिती सुधारलेली नाही. एका अभ्यासानुसार, ३७ टक्के लोक नवीन नोकरी शोधत नाहीत तर ५८ टक्के लोकांना वाटते, की या वर्षी तरी नोकरीच्या क्षेत्रात सुधारणा होईल आणि त्यांना नवीन नोकरी मिळू शकेल.

**नव्या नोकरीसाठी जास्त अर्ज**

नोकरीसाठी अनेक लोक एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी अर्ज करत आहेत. ४९ टक्के लोक पूर्वीपेक्षा जास्त नोकऱ्यांसाठी अर्ज करत आहेत; मात्र त्यांना कमी प्रतिसाद मिळत आहे. २७ टक्के 'एचआर' व्यावसायिक दररोज अशा अनेक अर्जांची छाननी करत आहेत. ५५ टक्के लोकांचे म्हणणे आहे, की त्यांना प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये कौशल्यांचा अभाव आहे.

**'लिंक्ड इन इंडिया'चा अहवाल**

भारतीयांनी नोकरी शोधण्याच्या पद्धतीत विचारपूर्वक बदल करण्याची आवश्यकता असून 'लिंक्डेन प्रोफाइल' अपडेट ठेवा आणि तुमच्या कौशल्यांशी जुळणाऱ्या भूमिकांवर लक्ष केंद्रित करा, असे लिंक्ड इन इंडियाचा अहवाल सांगतो.

**'एआय'चा वापर**

भारतातील ६० टक्के लोक नवीन क्षेत्रात काम करण्यास तयार आहेत. ३९ टक्के लोक या वर्षी नवीन कौशल्ये शिकण्याची तयारी करत आहेत. भविष्यात बहुतांश नोकऱ्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. हे पाहता 'लिंक्डेन' ने सर्वाधिक नोकऱ्या देणाऱ्या तीन नवीन क्षेत्रांचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअर, रोबोटिक्स टेक्निशियन आणि क्लोजिंग मॅनेजर यांचा समावेश आहे.

# हैदराबादला पर्यटकांची सर्वाधिक पसंती

भटकंती

२०२४ च्या वार्षिक अहवालानुसार, पुरी, वाराणसी आणि हरिद्वार ही सर्वाधिक भेट दिलेली धार्मिक स्थळे ठरली आहेत. हैदराबादलाही या वर्षी पर्यटकांची सर्वाधिक पसंती मिळाली आहे.

या अहवालात संपूर्ण वर्षातील बुकिंग डेटादेखील समाविष्ट करण्यात आला आहे. भारत हे नेहमीच धार्मिक स्थळांचे केंद्र राहिले आहे. या अहवालात पुरी, वाराणसी आणि हरिद्वार ही सर्वात जास्त पसंतीची तीर्थक्षेत्रे असल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे देवघर, पालणी, गोवर्धन या अध्यात्मिक स्थळांना कमी लोकांनी भेट दिली आहे. गोव्यापेक्षा या धार्मिक स्थळांना लोक जास्त भेट देत आहेत.

**उत्तर प्रदेशला भाविकांचा ओढा**




हैदराबादनंतर बेंगळूरू, दिल्ली आणि कोलकाता ही शहरे बुकिंगच्या



यादीत अव्वल आहेत. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे या यादीत उत्तर प्रदेशने प्रथम क्रमांकावर आपले स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्र, तेलंगणा आणि कर्नाटकातूनही भरपूर बुकिंग झाले आहे. पाटणा, राजमुंद्री आणि हुबळी या छोट्या शहरांच्या लोकप्रियतेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. या अहवालाच्या आधारे बुकिंगमध्ये ४८ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे समोर आले आहे. हा अहवाल प्रसिद्ध करणाऱ्या 'ओयाओ'ने म्हटले आहे, की या वर्षी सुट्ट्यांमध्ये खूप लोकांनी प्रवास केला आहे. यामध्ये जयपूरदेखील मागे नाही. ते पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहेच पण त्यानंतर गोवा, पाँडिचेरी आणि म्हैसूरसारखी सदाहरित आवडती ठिकाणेही गजबलेली राहिली आहेत. विशेष म्हणजे मुंबईत बुकिंगमध्ये घट दिसून आली आहे. 'ओयाओ' चे ग्लोबल चीफ सर्व्हिस ऑफिसर श्रीरंग गोडबोले म्हणाले, की २०२४ हे जागतिक प्रवासाच्या दृष्टिकोनातून खूप वेगळे वर्ष ठरले आहे.

# आयफोनच्या जुन्या वापरकर्त्यांना मिळणार व्हिज्युअल इंटेलिजेंस फीचर

टेक वर्ल्ड

'ॲपल'ने आयफोन वापरकर्त्यांना खूश केले आहे. कंपनीने घोषणा केली आहे की, आता आयफोन १५ प्रो आणि प्रो मॅक्स सारख्या जुन्या मॉडेल्सनाही आयफोन १६ मालिकेतील व्हिज्युअल इंटेलिजेंस फीचर मिळणार आहे. आगामी सॉफ्टवेअर अपडेटनंतर यूजर्स त्याचा आनंद घेऊ शकतील. आत्तापर्यंत हे फीचर फक्त आयफोन १६ सीरीजच्या उपकरणांमध्ये उपलब्ध होते. मात्र आता त्याची व्याप्ती वाढवली जात आहे.

या फीचरच्या मदतीने वापरकर्ते कोणत्याही वस्तू किंवा मजकुरावर कॅमेरा फोकस करू शकतात आणि त्याबद्दल माहिती मिळवू शकतात. हे ऑब्जेक्टची सर्व माहिती दर्शवू शकते आणि वापरकर्ते मजकुराचे भाषांतरदेखील करू शकतात.




याशिवाय पुस्तकांचा सारांश सादर करणे, कुत्र्यांची जात ओळखणे अशी कामेही होऊ शकतात. हे कोणत्याही परदेशी भाषेचे भाषांतर करू शकते आणि यासाठी वापरकर्त्यांना इतर कोणत्याही ॲपवर जाण्याची आवश्यकता नाही. शोध क्षमता वाढवण्यासाठी गुगल आणि चॅटजीपीटी त्यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

**असे वापरू शकता**

आयफोन १५ प्रो वापरकर्ते ॲक्शन बटन किंवा कंट्रोल सेंटरमधून या वैशिष्ट्यात प्रवेश करु शकतील. कंपनीने आयफोन १६ मध्येदेखील हे फीचर दिले आहे आणि यामध्ये देखील यूजर्स कॅमेरा बटनाशिवाय याचा फायदा घेऊ शकतील. आयफोन १६ मालिकेत प्रवेश करण्यासाठी एक खास कॅमेरा बटन आहे.

# 'मायक्रोसॉफ्ट'चे ॲंड्राईडपाठोपाठ ॲपलसाठीही 'एआय' सॉफ्टवेअर




वाचाल तर खरं..

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) च्या जगात टेक कंपन्यांमधील स्पर्धा वाढत आहे. 'ओपन एआय' ने स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. आता तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज 'मायक्रोसॉफ्टने'ही या लढाईत प्रवेश केला आहे. कंपनीने नुकतेच आपले मोबाईल 'एआय ॲप' सादर केले आहे. 'मायक्रोसॉफ्ट'च्या 'एआय' मोबाईल ॲपला 'कॉपायलट' असे नाव देण्यात आले आहे. हे ॲप 'ओपन एआय' च्या चॅटजीपीटी ॲपसारखे आहे. यापूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'ने 'ॲंड्रॉइड'साठी त्यांचे 'एआय' ॲप सादर केले होते. आता हे ॲपल वापरकर्त्यांसाठीदेखील सादर करण्यात आले आहे. आता 'मायक्रोसॉफ्ट'चे 'एआय ॲप' आयफोन आणि आयपॅडसारख्या ॲपल उपकरणांवरही वापरता येणार आहे.

**बिंग चॅटची अद्ययावत आवृत्ती**

'कॉपायलट' ॲप पूर्वी 'बिंग चॅट' म्हणून ओळखले जात होते. 'मायक्रोसॉफ्ट'ने काही अपडेट्ससह 'कॉपायलट' नावाचे ॲप सादर केले आहे. 'कॉपायलट' एआय ॲप 'ओपन एआय'च्या जनरेटिव्ह मोबाइल ॲप एआय चॅटजीपीटी प्रमाणेच कार्य करते. ॲंड्रॉइड प्ले स्टोअरसह ॲपल ॲप स्टोअरवर आता कॉपायलट ॲप उपलब्ध आहे. यासह 'एआय'च्या क्षेत्रात स्पर्धेची नवी फेरी सुरू झाली आहे. चॅटजीपीटीच्या ॲपपेक्षा चांगले मायक्रोसॉफ्टचे एआय ॲप 'कॉपायलट' हे चॅट असिस्टंटप्रमाणे काम करते. हे ओपन एआय च्या कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल्सच्या क्षमतांचा वापर करते. हे ओपन एआयच्या स्वतःच्या चॅटजीपीटी ॲपपेक्षा चांगले असल्याचे सिद्ध होते आहे कारण ओपन एआयच्या चॅटजीपीटी ॲपची विनामूल्य आवृत्ती जीपीटी ३.५ वर चालते, तर मायक्रोसॉफ्टचे कॉपायलट ॲप ओपन एआयच्या नवीन मोठ्या भाषा मॉडेल -४ वर कार्य करते.

**या ॲपद्वारे काय करू शकता?**

कॉपायलट ॲपबाबत, मायक्रोसॉफ्टचा दावा आहे, की ते वापरकर्त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल. या ॲपमध्ये चॅटबॉट कार्यक्षमता, डेल ई ३ द्वारा समर्थित प्रतिमा निर्मिती, ईमेल आणि दस्तऐवजांसाठी सुव्यवस्थित मजकूर मसुदा यांसारखी उत्कृष्ट वैशिष्ट्ये आहेत. हे ॲप साध्या मजकुराचे व्हिज्युअलमध्ये रूपांतर करण्यासदेखील सक्षम आहे.

# 'चॅटबॉट'मध्ये नवीन आवाज आणि प्रतिमा

भन्नाट

'ओपन एआय' त्याच्या चॅटबॉटमध्ये भिन्न आणि प्रगत ठेवण्यासाठी वेळोवेळी अनेक नवीन वैशिष्ट्ये जोडत आहे. कंपनीने सांगितले, की ती लवकरच 'चॅटबॉट'मध्ये नवीन आवाज आणि प्रतिमा क्षमता सादर करेल. त्यामुळे वापरकर्त्यांना त्यांचा आवाज वापरून प्रश्न विचारता येतील आणि मानवासारखा प्रतिसाद मिळू शकेल. म्हणजेच तुम्ही व्हॉइस असिस्टंटशी बोलता, त्याच पद्धतीने आता चॅटबॉटशीही बोलू शकाल. चॅटबॉट तुम्हाला तोंडी उत्तर देईल आणि तुम्ही क्रॉस प्रश्नदेखील विचारू शकाल.



'ओपन एआय' नुसार, 'चॅटजीपीटी' वापरकर्ते आता त्यांच्या मोबाईलवरून 'चॅटबॉट'शी संवाद साधू शकतात आणि रिअल-टाइम प्रतिसाद मिळवू शकतात. नवीन अपडेट सक्षम करण्यासाठी प्रथम मोबाइलवरील ॲप उघडा. नंतर सेटिंग्ज वर जा. येथे तुम्हाला नवीन वैशिष्ट्ये पर्यायाखाली व्हॉइस चॅट सक्षम करण्याचा पर्याय दिसेल. हे ऑन केल्यावर तुम्ही 'चॅटबॉट'शी बोलू शकता. 'ओपन एआय'ने सांगितले, की चॅट जीपीटी कंपनीच्या ओपन-सोर्स स्पीच रेकग्निशन सिस्टम व्हिस्परचा वापर करून बोललेले शब्द मजकुरात रुपांतरित करते.

आता तुम्ही 'एआय' चा चॅटबॉट उघडण्यासाठी चित्रांद्वारे प्रश्नदेखील विचारू शकता. उदाहरणार्थ, तुम्हाला सायकलचे सीट खाली करायचे असून ते कसे करायचे समजत नसेल, तर चॅटबॉटवरून याचे उत्तर मिळू शकते. यासाठी तुम्हाला सायकलचा फोटो चॅटबॉटशी शेअर करावा लागेल. त्यानंतर चॅटबॉट तुम्हाला स्टेप बाय स्टेप सीट खाली करण्याच्या टिप्स सांगेल. तुम्याकडे टूलकिट असल्यास त्याचा फोटोदेखील अपलोड करू शकता आणि तुम्हाला कोणते टूल वापरायचे आहे ते चॅटबॉटला विचारू शकता.

'ओपन एआय' म्हणते की, व्हॉइस चॅट आणि इमेज रेकग्निशन वैशिष्ट्ये ही आता वापरकर्त्यांना उपलब्ध असतील. या लोकांना पुढील १४ दिवसांत यासंबंधीचे अपडेट मिळणे सुरू होईल. तुम्हाला लेटेस्ट अपडेट वापरायचा असेल तर चॅटजीपीटी प्लस चे सबस्क्रिप्शन घ्यावे लागेल.

# 'सॉफ्टवेअर'शी संबंध नसणारी व्यक्ती 'मेटा इंडिया'ची प्रमुख

अचिव्हर

**आजकाल 'सोशल मीडिया'वर प्रत्येकाचे अकाऊंट असते. एकमेकांशी संपर्कात राहण्यासाठी, चांगल्या-वाईट आठवणी शेअर करण्यासाठी फेसबुक, व्हॉट्सॲप आणि इंस्टाग्रामचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. 'मेटा' ही या तिघांची पॅरेंट कंपनी आहे. ती जगातील मोठ्या टेक कंपन्यांपैकी एक आहे. मात्र या कंपन्यांची 'इंडिया हेड' असणारी व्यक्ती भारतीय असून तिचा सॉफ्टवेअर जगाशी दूरदूरपर्यंत संबंध नाही, असे कोणी तुम्हाला सांगितले तर विश्वास बसेल का? नाही ना? परंतु हे खरे आहे. या क्षेत्रातील कोणतीही पदवी नसताना त्या 'मेटा'च्या इंडिया हेड कशा बनल्या? चला, जाणून घेऊ या.**

संध्या देवनाथन सध्या 'मेटा'च्या उपाध्यक्ष आणि 'मेटा इंडिया'च्या व्यवस्थापकीय संचालक आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांना अजित मोहन यांच्या जागी 'मेटा इंडिया'चे प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले. यानंतर जानेवारी २०२३ मध्ये त्यांनी पदभार स्वीकारला. त्या वेळी संध्याजी 'मेटा'च्या 'गेमिंग प्रोजेक्ट'चे नेतृत्व करत होत्या. संध्या यांनी आपल्या करिअरमध्ये मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे लाखो तरुणांसाठी त्या प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत.

**'मेटा'मध्ये 'ग्रु प डायरेक्टर' म्हणून नियुक्ती**

संध्या देवनाथन २०१६ मध्ये 'मेटा ग्रुप'मध्ये सामील झाल्या. त्यांनी सिंगापूरमध्ये 'मेटा'मध्ये 'ग्रुप डायरेक्टर' म्हणून नियुक्ती स्वीकारली होती. 'साउथ इस्ट एशियन मार्केट'मध्ये मेटाच्या ई-कॉमर्स, ट्रॅव्हल आणि आर्थिक सेवांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यांनी सिंगापूर आणि व्हिएतनाममध्ये कंपनीचा व्यवसाय वाढवण्यास मदत केली. नंतर त्यांना सिंगापूरमध्ये व्यवस्थापकीय संचालक आणि व्हिएतनाममध्ये कंपनीची व्यवसाय प्रमुख बनवण्यात आले. यानंतर २०२० मध्ये त्या 'मेटा'च्या आशिया-पॅसिफिक प्रदेशातील गेमिंग प्रोजेक्टचे नेतृत्व करण्यासाठी त्या इंडोनेशियाला गेल्या.

**'लीडरशीप कोर्स'ने बदलले आयुष्य**

संध्या देवनाथन यांच्या शिक्षणाविषयी फार कमी जणांना माहिती आहे. संध्या यांनी आंध्र प्रदेश विद्यापीठातून 'केमिकल इंजिनीअरिंग'मध्ये बी. टेक केले. त्यांनी १९९४ ते १९९८ पर्यंत आंध्र' प्रदेशमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर १९९८ ते २००० पर्यंत त्यांनी दिल्ली विद्यापीठातून एमबीए केले. २०१४ मध्ये त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी बिझनेस स्कूलमधून लीडरशीपचा कोर्स केला आणि या कोर्समुळेच त्यांच्या करिअरला कलाटणी मिळाली. त्यांचे व्यवस्थापन कौशल्य बळकट झाले. पुढे याच कौशल्यामुळे त्यांना विविध जबाबदाऱ्या मिळाल्या.

**विविध पदांचा अनुभव**

'मेटा'मध्ये सामील होण्यापूर्वी संध्या यांनी साधारण २२ वर्षे वेगवेगळ्या क्षेत्रात काम केले. यात त्यांना करिअर समृद्ध करणारा अनुभव मिळाला. त्यांनी बँकिंग, पेमेंट आणि तंत्रज्ञान क्षेत्रातही काम केले. त्यांनी २००० ते २००७ पर्यंत 'सिटी ग्रुप'मध्ये विविध पदांवर काम केले. त्यानंतर २००९ ते २०१५ पर्यंत स्टँडर्ड चार्टर्डमध्ये काम केले.

**'मेटा'च्या मुख्य व्यवसाय अधिकाऱ्यांकडून कौतुक**

संध्या यांना प्रॉडक्ट इनोवेशन आणि पार्टनरशिप बिल्डिंग क्षेत्रातील तज्ज्ञ मानले जाते. 'मेटा'च्या मुख्य व्यवसाय अधिकारी मार्ने लेव्हिन यांनी संध्या यांची 'इंडिया हेड' म्हणून नियुक्ती केली.



# आता 'जय शिवराय'ने होणार
## शरद पवार गटाच्या सर्व कार्यक्रमांची सुरुवात

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :**

**मुंबईत झालेल्या बैठकीत निर्णय**



राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या सर्व कार्यक्रमांची सुरुवात आता 'जय शिवराय' या संबोधनाने होणार आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी ही माहिती दिली.

मुंबईत झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. फोनवरील संभाषण आणि सार्वजनिक भाषणांच्या सुरुवातीला 'जय शिवराय' म्हटले जाणार आहे.

देशमुख यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केले. खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीच्या संदर्भात बजरंग दलाने केलेल्या कार सेवेच्या घोषणेकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कापूस खरेदीच्या विषयावर बोलताना देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या हिताची काळजी व्यक्त केली. सीसीआयने शनिवारपासून कापूस खरेदी बंद केल्याने व्यापारी फायदा घेतील आणि शेतकरी अडचणीत येतील असे त्यांनी सांगितले. सरकारने तातडीने कापूस खरेदी सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

राजकीय वातावरणाबाबत बोलताना त्यांनी सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांच्या वक्तव्यांचा उल्लेख केला. कोरटकर प्रकरणावरही त्यांनी टीका केली. पोलिसांच्या उपस्थितीत कोरटकर नागपुरातून फरार झाल्याचे सांगून राज्य सरकारने त्याला योग्य तो जोसे न दिल्याने जामीन मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

अनिल देशमुख यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. विधासभेच्या निवडणुकीत ईव्हीएम डुप्लिकेट, मतदार याद्या डुप्लिकेट म्हणून त्यांचा विजय सुद्धा डुप्लिकेट झाला आहे. एक बाहुल गेलं आणि दुसरं बाहुल आलं अशी परिस्थिती सध्या इलेक्शन कमिशनची आहे. निवडणुकीच्या काळात भारतीय जनता पक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठे आश्वासनं दिले होते. आमचं सरकार आलं तर आम्ही शेतक?्यांची कर्जमाफी करू असं भाजपने सांगितलं होतं. पण आता चार महिने झाले आहेत, शेतकरी आता कर्जमाफीची वाट पाहत आहेत. शेतक?्यांसाठी तुम्ही वीस हजार कोटी रुपये खर्च करू शकत नाहीत? असा हल्लोबोल यावेळी अनिल देशमुख यांनी केला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, सरकार लाडक्या बहिणींचे पैसे २१०० रुपये करणार होते, ते २१०० तर केलेच नाहीत, मात्र या योजनेतून अनेक महिलांना वगळण्यात आलं आहे. राज्यात कायदा सुव्यवस्था ढासळली आहे. तूम्ही जर गुंडांना संरक्षण द्याल तर राज्यात कायदा व सुव्यवस्था कशी राहील? लोकांचे जे प्रश्न आहेत, त्यांना वाच्या फोडण्यासाठी आम्ही जनतेपुढे जात आहोत, आणि संपूर्ण राज्यात हा दौरा सुरू राहणार आहे.

महाराष्ट्रातील जनता या प्रशासक राजला आता कंटाळली आहे, त्यामुळे राज्य शासनाने महानगरपालिका, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेतल्या पाहिजेत. सरकार कायद्याची बाजू मांडण्यात कमी पडते का? हे सुद्धा तपासून घेतलं पाहिजे. असा हल्लाबोल यावेळी अनिल देशमुख यांनी सरकारवर केला आहे.

# कोरटकरला जेल की बेल? आज निर्णय

**■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १७ :**

**जामिनावर सुनावणी पूर्ण**



इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत धमकी प्रकरणी प्रशांत कोरटकर याच्या जामीन अर्जावर आज कोल्हापूर सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. या प्रकरणात दोन्ही बाजूचा युक्तीवाद पार पडला.

युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोल्हापूर सत्र न्यायालयाने निकाल आज राखून ठेवला आहे. प्रशांत कोरटकरच्या जामीनावर न्यायालय मंगळवारी निकाल देणार आहे.

सुनावणीला प्रशांत कोरटकर याच्याकडून सौरभ घाग, सरकारी वकील विवेक शुक्ल तर इंद्रजीत सावंत यांच्याकडून वकील असिम सरोदे हे उपस्थित होते. दरम्यान, आवाजाचा नमुना नोंद करण्यासाठी मी कोणत्याही वेळी उपलब्ध असेल, असा अर्ज प्रशांत कोरटकरने न्यायालयात दिला आहे.

आम्ही मोबाईल जमा केलेला आहे, त्यामुळे स्वतः अटक होण्याची कोणती गरज नाही. पोलिसांनी अटक होण्यासाठी सांगितलेली कारणे गंभीर आहेत, असा युक्तीवाद प्रशांत कोरटकरच्या वकिलांनी केला.

स्वातंत्र्य म्हणजे सोयराचार नाही, त्यामुळे बोलण्याच्या स्वातंत्र्याचा गैरउपयोग प्रशांत कोरटकरने केला आहे. दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे आहे आणि अशी वक्तव्ये आणखी कुणी करू नये, यासाठी प्रशांत कोरटकरची अटक गरजेची आहे, असा युक्तीवाद सरकारी वकील विवेक शुक्ल यांनी केला.

प्रशांत कोरटकरकडून न्यायालयाची दिशाभूल सुरू आहे, असा युक्तीवाद इंद्रजीत सावंत यांचे वकील असिम सरोदे यांनी केला.

# औरंगजेब कबर विरोधात आंदोलन

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**

विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने नागपुरात औरंगजेबाच्या कबरविरोधात जोरदार आंदोलन केले. विहिंपचे महाराष्ट्र व गोव्याचे क्षेत्रमंत्री गोविंद शेंडे यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला की औरंगजेबाची कबर सरकारनेच हटवावी. जर सरकारने कारवाई केली नाही, तर बजरंग दल कारसेवा करून ही कबर समुद्रात फेकेल.

महाल परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर झालेल्या आंदोलनात कार्यकर्त्यांनी औरंगजेबाचे पोस्टर फाडून ते पायदळी तुडवले.

शेंडे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे नेते संजय राऊत यांच्यावर टीका केली. बाळासाहेब ठाकरेंच्या निधनानंतर राऊतांनी हिंदुत्व सोडले असून त्यांना स्वतःला हिंदू म्हणवण्याचा अधिकार राहिलेला नाही. त्यांनी सरकारला इशारा दिला की कायदा सुव्यवस्थेची स्थिती बिघडल्यास त्याची जबाबदारी सरकारवर राहील, असे ते म्हणाले.




## बासंबा' मारहाणीचा मुद्दा विधानसभेत गाजला

**■ महासागर प्रतिनिधी वाशिम, दि. १७ :**

हिंगोली तालुक्यातील बासंबा शिवारातील शिवरस्ता काढण्याच्या कारणावरून मारहाण झाल्याचा मुद्दा आमदार गोपीचंद पडळकर यांनी सोमवारी उपस्थित केला.

या प्रकरणात आरोपींवर गंभीर गुन्हे असून त्यांच्यावर हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्यास पोलिस अधिक्षक हिंगोली यांना सूचना देण्याची मागणीही आमदार पडळकर यांनी केली आहे.

तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी नाईक, सय्यद व इतर दोन कर्मचारी शिवेवरील रस्ता काढून देण्यासाठी आले होते. यावेळी अल्पसंख्यांक समाजातील काही लोकांनी मारहाण केली. या घटनेमध्ये पोलिसांवर दबाव असल्याचा आरोप त्यांनी केला. गंभीर गुन्हे असलेल्यांवर हद्दपारीचे प्रस्ताव देण्याच्या सुचना पोलिस अधिक्षक हिंगोली यांना द्यावेत अशी मागणी त्यांनी केली.

# आठवडाभरात दुसरा खून

**दगडाने ठेचून युवकाची हत्या**

**■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ,दि. १७ :**

शहरात पुन्हा खुनाचे सत्र सुरू झाले आहे. चार दिवसांपूर्वी येथील लोहारा औद्योगिक वसाहतीत तरुणाच्या खुनाची घटना घडली होती. त्याची शाई वाळते न वाळते तोच, लोहारा लगत असलेल्या वाघापूर परिसरात आज सोमवारी पहाटे तरुणाचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना उजेडात आली.

आशीष माणिकराव सोनोने (३३) रा. प्रिया रेसिडेन्सी, चौसाळा रोड असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहे. आशीष हा रविवारी रात्री वाघापूर येथील आपल्या मित्राकडे गेला होता. यावेळी त्याच्यासोबत एका युवकाचा वाद झाला होता. काही मित्रांनी यात मध्यस्थी करून हा वाद मिटविला.

दरम्यान मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास दोन तरुणांनी आशीषवर हल्ला केला. त्याची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आली. त्याचा मृत्यू झाल्याची खात्री झाल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. आज सोमवारी पहाटे ही घटना उजेडात आली. अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसने, लोहारा पोलीस ठाण्याच्या ठाणेदार यशोधरा मुनेश्वर व पोलीस कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक यांनी घटनास्थळ गाठले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. या तरुणाच्या हत्यचे नेमके कारण कळू शकले नाही. पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. आठवड्याभरात शहरात खुनाची दुसरी घटना घडल्याने शहरातील गुन्हेगारीने पुन्हा डोके वर काढल्याची चर्चा आहे.

# कंत्राटदाराच्या हलगर्जीपणावर विजय वडेट्टीवार आक्रमक

**घोडाझरी तलावात बुडून पाच तरुणांच्या मृत्यूचे प्रकरण**

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १७ :**

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडाझरी तलावात पर्यटनासाठी गेलेल्या पाच तरुणांचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. चिमूर तालुक्यातील या तरुणांचा मृत्यू त्यांच्या कुटुंबीयांसाठी अत्यंत दुःखद आहे. विशेष म्हणजे, या तलावात याआधीही नागपूरच्या काही तरुणांचा मृत्यू झाला आहे.

या तलावात तीन पाणीपुरवठा योजना सुरू असून, कंत्राटदाराने खोदलेला मोठा खड्डा मृत्यूचा सापळा ठरत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी हा खड्डा बुजवावा अशी वारंवार मागणी केली होती. मात्र, कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्याने या ठिकाणी आणखी बळी गेले आहेत. विधानमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी हा गंभीर मुद्दा औचित्याच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला. ते म्हणाले, ?या तलावात आतापर्यंत १५ तरुणांचा मृत्यू झाला आहे. तरीही प्रशासन आणि कंत्राटदार बेफिकीर आहे. हा खड्डा त्वरित बुजवावा, अशी मागणी त्यांनी केली.

**विधानसभा अध्यक्षांचे निर्देश**

या दुर्घटनेची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी शासनाला त्वरित निवेदन देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# : साप्ताहिक संवाद : शून्य कार्बन उत्सर्जन हेच पर्यावरणाचे रक्षण

नेमेचि येतो मग....या उक्ती प्रमाणे दरवर्षीच्या उन्हाळ्यात तापमान वाढीचे नवनवीन उच्चांक मोडीत निघत आहेत. तापमानाचा पारा जितका उंचावतो आहे तितकच सभोवतालचे वातावरण देखील उष्ण होत आहे. जागतिक तापमान वाढीचा गंभीर प्रश्न यातूनच निर्माण झालेला असून मागील दोन दशकांमध्ये या विषयावर सातत्याने चर्चा होते आहे. जागतिक तापमान वाढ आणि त्याचे मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम याच अनुषंगाने मराठी विज्ञान परिषद मुंबईत कार्यरत असलेले शास्त्रज्ञ डॉ. अ. पा. देशपांडे याच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**अलीकडच्या प्रामुख्याने दोन दशकचा विचार केला तर उन्हाळ्यात सातत्याने तापमान वाढते आहे याची कारणं काय आहेत?**

■ दरवर्षी तापमान वाढीचा हा प्रश्न अधिकाधिक गंभीर होत चालला आहे हे अगदी खरे आहे.याचे प्रमुख कारण म्हणजे जागतिक स्वरूपात मोठ्या प्रमाणात सातत्याने होत असलेले कार्बन.सारख्या महाभयानक अशा विषारी.वायूचे वातावरणात होणारे उत्सर्जन हे आहे.वाहनांमध्ये वापरले जाणारे पेट्रोल, डिझेल ,सी एन जी सारख्या जीवाश्म इंधना मुळे मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जित होतोय.शिवाय घरगुती स्वरूपात, कार्यालय, कारखाने, इस्पितळ, मॉल अशा अनेक माध्यमातून जी वातानुकूलित यंत्रणा आहे त्याव्दारे देखील. मोठ्या प्रमाणत कार्बन वायू बाहेर फेकला जातो आहे. त्याचवेळी विविध औद्योगिक स्वरूपातील वायू प्रदूषण आणि त्यामुळे पृथ्वी भोवती जे ओझोन चे संरक्षक कवच होते त्याला आता भोके पडू लागलेली आहेत.परिणामतः सूर्याची तीव्र अतिनील किरण ही थेट पृथ्वीवर पडत असल्याने तापमानात सातत्याने वाढ होतेय.

**या तापमान वाढीचा मानवी आणि एकूणच सजीव सृष्टीवर गंभीर दुष्परिणाम होतोय तो नेमका कसा?**

■ मागील दोन दशकात तापमान सतत वाढत असल्याने त्याचा वातावरणावर दुष्परिणाम होतो आहे. परिणामी पूर्वी कधीही न ऐकलेले असे त्वचा विकार उद्भवतना दिसत आहेत. मध्यंतरी कोरोनाची साथ येऊन गेली आणि त्यानंतर अनेक नव्या संसर्गजन्य आजाराची नाव समोर येताना आपण पाहिली आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार देखील बळवताना दिसतात. अती उष्णता मानाचा पक्षी आणि प्राण्यांच्या आरोग्यावर देखील परिणाम होत असून अनेक प्राण्याच्या जाती नष्ट होत चालल्या आहेत. निसर्ग संपदा आणि शेतीला देखील या तापमान वाढीचा जबरदस्त फटका बसत असून पिकांच्या काही जाती नामशेष होत आहेत,जमीन नापीक बनते आहे, अशी अनेक कारणं सांगता येतील जी जागतिक तापमान वाढीमुळे आहेत.

**ही तापमान वाढ कमी करता येणं शक्य नाही का?**

लोकरंग

■ हो, जागतिक स्वरूपात होत असलेली ही तापमान वाढ कमी करण शक्य नक्कीच आहे.परंतु त्याकरिता जागतिक स्तरावर युद्ध पातळीवर प्रयत्न होणे तितकेच गरजेचे आहे.जगभरातील प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य म्हणून आणि मानवी अस्तित्व टिकविण्यासाठी एक तरी झाड लावून त्याचे कायम स्वरुपी संवर्धन करायलाच हवे.

याशिवाय वातानुकूलित यंत्रणेचा वापर हा केवळ अपरिहार्य असेल तिथेच करायला हवा ज्यामुळे कार्बनचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणत कमी होईल. त्यासाठी नैसर्गिक अशा विद्युत आणि सौर ऊर्जेवर चालणाऱ्या प्रदूषण मुक्त वाहनाचा वापर वाढविणे गरजेचे आहे.औद्योगिक कारखान्यांमधून मोठ्या प्रमाणात होणाऱ्या कार्बन, कार्बन मोनोकसाईड, नायट्रोजन अशा घातक वायूंचे प्रदूषण कमीत कमी होईल याची दक्षता घ्यायला हवी. आपला सभोवताल हा जास्तीत जास्त हिरवागार केला तर तापमान वाढ काही अंशाने तरी कमी करण्यात यश येईल. ■ ■

## बीआयएस मुंबई शाखेतर्फे 'क्वालिटी कनेक्ट' अभियानाची सुरूवात

भारतीय मानक ब्यूरो (बीआयएस), मुंबई शाखा कार्यालय-२ ने 'क्वालिटी कनेक्ट' (क्वालिटी कॅम्पेन-७.०) अभियानाची सुरूवात केली आहे. या अभियानाद्वारे सरकारी विभागांमध्ये गुणवत्ता मानकांची आणि प्रमाणपत्रांची जागरूकता वाढवणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. ११ मार्च ते २० मार्च २०२५ या कालावधीत, या अभियानाद्वारे ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील सरकारी कार्यालयांना कव्हर करण्यात येणार आहे.




या अभियानाचा उद्देश सरकारी अधिकारी, बीआयएस मानकांचा अवलंब करण्यास, प्रमाणित उत्पादनांचा वापर प्रचारित करण्यास आणि नियामक अनुपालन सुनिश्चित करण्यास प्रोत्साहन देणे आहे. बीआयएस तज्ज्ञ, मानक मित्र आणि संसाधन व्यक्ती (आरपी) अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधणार असून, बीआयएस केअर ॲप आणि प्रमुख गुणवत्ता आश्वासन उपक्रमांवर माहिती देणार आहेत. यासोबतच माहिती पत्रके आणि पुस्तिका वितरित केली जातील.

जागतिक ग्राहक हक्क दिनसोबत जुळवून घेतलेली ही योजना ग्राहक संरक्षण आणि उत्पादन सुरक्षा याच्या महत्त्वावर प्रकाश टाकते. बीआयएसने संबंधित जिल्ह्यांतील सरकारी अधिकाऱ्यांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन गुणवत्ता संस्कृती प्रस्थापित करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे, जे उद्योग आणि ग्राहक दोघांसाठीही फायदेशीर ठरेल. ■



## झोमॅटो देणार महिलांना दुचाकी चालवण्याचे प्रशिक्षण

भारतातील फूड ऑर्डरींग आणि डिलिव्हरी प्लॅटफॉर्म-झोमॅटोने महिला रायडिंग सेंटरची सुरुवात करण्याची घोषणा केली आहे. झोमॅटो पुरस्कृत या उपक्रमाद्वारे महिलांसाठी दुचाकी चालवण्याचे प्रशिक्षण देणे सोपे होईल. महिलांना त्यांचा वेग वाढवून अधिक सक्षम करणे असा झोमॅटोचा यामागील उद्देश आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) च्या मालकीचे पहिले केंद्र BMC चे महानगरपालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी कअर यांच्या हस्ते सुरु करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते शहरातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला डिलिव्हरी पार्टनर्सचा सत्कारही केला. झोमॅटोने एक फिल्मदेखील लॉंच केली. यात हे केंद्र महिलांना दुचाकी चालवण्यासारखे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य शिकवून कसे सक्षम करेल, ज्यामुळे गिग वर्कसह विविध व्यावसायिक संधींचे दरवाजे उघडतील, हे दर्शवण्यात आले आहे.

मोठ्या संख्येने जनाधार असलेल्या BMC सारख्या राष्ट्रीय आणि स्थानिक संस्थांच्या मदतीने, झोमॅटो महिलांना दुचाकी इलेक्ट्रिक वाहने (EVs) चालवण्याचे प्रशिक्षण देईल. रायडिंग कौशल्यासोबतच या उपक्रमाद्वारे महिलांना शहरांमध्ये दिशा शोधण्यासाठी स्मार्टफोन वापरणे आणि आयुष्यातील सर्व आघाड्यांवर कणखर संवाद क्षमता यांसारख्या जीवनावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. मुंबई, अहमदाबाद यांसारख्या प्रत्यक्ष केंद्रांद्वारे झोमॅटो हे प्रशिक्षण देईल. व्यावहारिक कौशल्य आणि शिकण्याचे उत्तम वातावरण प्रदान करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## हजारोच्या पाणीपट्टी बिलाविरोधात आझाद मैदानावर आंदोलन

**■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :**

अकोला महापालिकेच्या पाणीपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आहे. शहरातील नळधारकांना त्रुटीची हजारो रुपयांची देयके दिली जात आहेत. या प्रकरणात देयकांमधील त्रुटी दूर करून अभय योजना लागू करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक नीलेश देव यांच्या नेतृत्वात थेट मुंबईतील आझाद मैदानावर सोमवारपासून धरणे आंदोलन सुरू करण्यात आले.

२०१६ मध्ये अकोला महापालिकेने शहरात पाणी मीटर बसवले. देयक प्रक्रियेत अनियमितता असल्याने सुमारे ५० हजार नळधारकांना पाच ते नऊ वर्षांची मोठ्या रकमेची एकत्रित देयके पाठवण्यात आली. यामुळे नळधारकांवर अनावश्यक आर्थिक बोजा पडत आहे. जोडणी दिल्यापासून अनेक वर्ष नागरिकांना देयके पाठवण्यात आली नाहीत.

त्यानंतर अचानक मोठ्या रकमेची एकत्रित देयके दिली गेली. अनेक प्रकरणांमध्ये, मीटरचे रीडिंग घेतले गेले नाही किंवा चुकीचे रीडिंग नोंदवले गेले. पाणीपट्टीची थकबाकी ६० कोटींपेक्षा जास्त झाली. मागील सहा वर्षांसाठी प्रति वर्ष एक हजार रुपये निश्चित करून अभय योजना लागू करण्याची मागणी केली जात आहे. महापालिकेला वेळोवेळी निवेदने देण्यात आली असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आल्याचे नीलेश देव यांनी सांगितले. दरम्यान, शासन किंवा प्रशासनाने या आंदोलनाची कोणतीही दखल घेतली नाही. सोमवारी आंदोलनस्थळी अधिकारी आले नसल्याचे आंदोलनकर्ते संतप्त झाले होते.



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. १७ :**

अभिनेता सलमान खानचा बॉडीगार्ड शेरा आज अचानक विधानभवनात दाखल झाला. तो नेमक्या कोणत्या कारणामुळे विधानभवनात आला? हे स्पष्ट झाले नाही. पण त्याच्या या अचानक भेटीचा गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईकडून सलमानला मिळणाऱ्या धमक्यांशी संबंध जोडला जात आहे.

## सिंबायोसिस-डीकिन विद्यापीठाचा नवा उपक्रम

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :**

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ व डीकिन विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया यांच्या सहकार्याने दुहेरी पदवी कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे येथे विद्यार्थ्यांना ४ वर्षांच्या अभ्यासक्रमात दोन बॅचलर डिग्री देण्यात येणार आहेत.

या दुहेरी पदवी कार्यक्रमामध्ये बी.टेक (सिव्हिल इंजिनिअरिंग), बी.टेक (कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग), बी.टेक (कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग) आणि बॅचलर ऑफ सायबर सिक्युरिटी इत्यादी पदवींचा समावेश करण्यात आला आहे.

## सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्याचा दुचाकी अपघातात मृत्यू

**■ हिंगोली, दि. १७ :**

पिकअप वाहन व दुचाकीची धडक होऊन दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. अशोक कामाजी खोकले (५०) असे मृतकाचे नाव असून ते हिंगोली जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागात सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होते.

खोकले हे त्यांच्या गावी गेले होते. काम आटोपून सायंकाळी हिंगोलीकडे परत येत असताना पिकअप वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी खोकले यांचा मृत्यू झाला.

# माजी आमदार दादाराव केचे यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**■ महासागर प्रतिनिधी आर्वी, दि. १७ :**




माजी आमदार दादाराव केचे यांना भाजपाने विधान परिषदेची उमेदवारी जाहिर केली असून त्यांनी सोमवार १७ मार्च रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

विधानपरिषद सदस्य विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झाल्यामुळे पाच जागा रिक्त होत्या. तिन जागा भाजपकडे असून संदीप जोशी, संजय केणेकर व दादाराव केचे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. राष्ट्रवादी अजीद दादा गटाकडून संजय खोडके यांनी तर, शिवसेना शिंदे गटाकडून चंद्रकांत रघुवंशी यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत माजी आमदार दादाराव केचे यांनी आर्वी विधानसभेची भाजपाकडून उमेदवारी मागीतली होती. मात्र, त्यांना डावलून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानद सचिव सुमीत वानखेडे यांना उमेदवारी दिल्या गेली. यामुळे संत्पत झालेल्या माजी आमदार दादाराव केचे यांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

राज्यातील बड्या नेत्यांनी त्यांना उमेदवारी मागे घेण्याकरीता विनवणी केली . शेवटी केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांचा सहारा घ्यावा लागला. राज्याच्या भाजप अध्यक्षांनी त्यांची तातडीने केंद्रीय गृह मंत्री अमीत शहा यांच्यासोबत भेट घडविली. याकरीता चार्टर विमानाचा वापर करण्यात आला.

या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत केंद्रीय गृह मंत्री अमीत शहा यांनी विधान परिषदेची उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता. हा शब्द आज खरा ठरला आहे.

भाजप वाढविण्याकरीता दादाराव केचे यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. अनेकांना राजकारणात आणले. बहुमान मिळवून दिला. मात्र, नंतर अनेकांनी पलटी मारली. केचे यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळु नये याकरीता बरेच प्रयत्न केले . परंतु, ते सर्व निष्फळ ठरले . सोमवारी दादाराव केचे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल . यावेळी त्यांचे सोबत पालक मंत्री पंकज भोयर, माजी खासदार रामदास तडस, आमदार सुमीत वानखेडे, आमदार प्रताप अडसड, माजी जिल्हापरिषद अध्यक्षा सरिता गाखरे, पत्रकार विजय अजमीरे, राजु डोर्लीकर, अनील दारोकर हजर होते.

विधान परिषदेवर निवडून जाणाऱ्या सदस्यांना अवघ्या १३ महिन्यांचीच संधी मिळणार असल्याची माहिती आहे.